

# श्री साईलीला

५० न.

१९६०

स्थापना १९१६



साईबाबांच्या

मूर्ती पूजेची भांडीं

व

चांदीचे

सोन्याचे

मोत्यांचे

सर्व प्रकारचें दागिने तयार करणारी मुंबईंतील विश्वासू सुप्रसिद्ध पेढी

# ई. आर. मालपेकर

जितेकर चाळ, ठाकुरद्वार, मुंबई नं. २



# श्रीसाईवाक्सुधा

देवाच्या दारीं मानसन्मान व्हावा. त्या मानाची मातब्बरी आहे. पदर पसरायचा तर तो देवापुढें पसरावा. माणसांपुढें पसरून काय मिळणार आहे ? त्याचा प्रसाद मिळविण्यासाठीं नेहमीं झटावें. तोच चिरंतन काळ टिकणारा असतो. लौकिकदृष्ट्या मिळणारे मानसन्मान क्षणिक असतात. लोकांनीं कांहीं ना कांहीं कारणांमुळें तुझा मानसन्मान केला तर तेवढ्यानें हुरळून जाण्याचे कांहीं कारण नाहीं. तुझें लक्ष तुझ्या आराध्य देवाकडे सदैव असावें. आयुष्यांतील चढउतारांनीं आनंदी किंवा दुःखीकष्टी होऊं नये. मन एका जागीं स्थीर करावें. हें जें देवभक्तीचें ध्येय आहे तें सदैव दृष्टीसमोर असावें. त्यांत रंगून जाण्यांत गोडी वाटावी. सर्व इंद्रियांचें लक्ष त्या एकठायीं केंद्रीभूत व्हावें; मनाला तेंच एक वेड लागावें. इतर कोणत्याहि गोष्टींत मन रंगू नये किंवा कशाचीहि गोडी वाटूं नये. मनाचें एकच लक्ष असावें; एकच चिंतन असावें. माझें नामस्मरण हेंच सर्वस्व होऊन रहावें व इतर सर्व गोष्टींचा विसर पडावा. 'सदैव ऐसें भजन घडो । इतर कांहींही नावडो । मन मन्नामस्मरणीं जडो । विसर प ो अवघ्यांचा ॥'

—श्रीसाईसच्चरित (अ. ६ वा.)

[ शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक ]

वर्ष ३८ वें ]       जून १९६०       [ अंक ३ रा

: संपादक :

**नागेश आत्माराम सावंत**

वार्षिक वर्गणी रु. ५ (ट. ख. सह)

टे. नं. २५१२७४

: कार्यालय :

ईस्ट ॲण्ड वेस्ट इं. कं. बिल्डिंग, ४९।५५ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुं. १

# प्रिय वाचक—

'भाव तसा देव' हें वाक्य आमच्या नेहमीं जिव्हेवर खेळत असतें; परंतु तें अंतर्यामापर्यंत मात्र सहसा जाऊन पोहोंचत नाहीं. जशी आपण भावना बाळगावी तसें त्याचें फळ पदरांत पडतें. या ठिकाणीं भाव हा शब्द श्रद्धा अर्थानें वापरण्यांत आलेला आहे. जशी तुमची श्रद्धा असेल, तसें तुम्हीं होतां; परंतु मनुष्यानें श्रद्धेचा आश्रय हा केलाच पाहिजे. जेथें श्रद्धा नाहीं तेथें आस्था नाहीं, तळमळ नाहीं. आणि जेथें तळमळ नाहीं तेथें कांहींच नाहीं.

आमच्यापैकीं पुष्कळांचें जीवन श्रद्धाहीन असतें. आयुष्य कसें तरी ढकलावयाचें हा असतो त्यांचा निर्माल्यवत् जीवनक्रम. त्यांत जिवंतपणा किंवा चैतन्य मुळींच नसतें. त्या जीवनाला का मानवी जीवन म्हणावयाचें ? तुम्हीं कांहीं करा, कोणतेंही कार्य हातीं घ्या. त्याच्यामागें श्रद्धेचें पाठबळ हें असलेंच पाहिजे. ज्या प्रमाणांत तें पाठबळ असेल त्या प्रमाणांत तुम्हीं यश संपादन कराल.

'भाव तसा देव.' तुम्हीं आपल्या हातीं घेतलेल्या कार्यांत घवघवीत यश मिळविणें हा एक दैवी चमत्कारच आहे. तो चमत्कार तुम्हीं श्रद्धेच्या बळावर पार पाडून दाखवूं शकतां. ज्याची जशी श्रद्धा असेल तसें त्याला फळ मिळतें; आजकाल रोजच्या व्यवहारांत याचा अनुभव आपण घेत आहोंत. बाबा म्हणतात, 'तुम्हीं कोणी कुठेंहीं असा आधी मजपुढें पसरितां पसा । मी तुमचिया भावासरिसा रात्रंदिसा उभाच ॥

स्थळाचा, काळाचा वा व्यक्तीचा येथें संबंध नाहीं. कोणत्याही देशाच्या कोणत्याही भागांत तुम्हीं असा; तुम्हीं कोणत्याही समाजाचे घटक असा; तुम्हीं जें कांहीं कराल, जें जें हातीं घ्याल तें तें माझ्या आठवणीनें, माझ्यावर संपूर्ण भाव ठेऊन करा; एवढें केलेत म्हणजे तुमच्या पुढील यशाची चिंता वहाणारा मीं आहें.

तुमच्याकडून अपेक्षा आहे ती श्रद्धेची. ती श्रद्धा वरवरची नको; ती अंतःकरणापासून जन्माला आलेली श्रद्धा पाहिजे. तेवढें लेणें तुम्हीं घातलेत मग मी तुमच्यापासून दूर नाहीं. मग माझें घर तुमच्या अंतःकरणांतच आहे म्हणून समजा; मग मी आणि तुम्हीं वेगळे नाहीं. श्रद्धेच्या बळावर एवढी एकतानता साधतां आल्यावर या जगांत तुम्हांला काय उणें पडणार आहे? माझ्या अस्तित्वाची जाणीव झाल्यावर मग तुम्हांला उणीव कसली भासणार आहे ?

'भाव तसा देव' असें आहे श्रद्धेचें महत्त्व. आजवर होऊन गेलेल्या साधुसंतांनीं आपणांस हेंच सांगितलें आहे. 'भाव धरा रे । अपुलासा देव करा रे ॥ तुम्हांला देव हवा आहे ? तुम्हांला देवाच्या ठायीं असलेले उच्च गुण प्राप्त करून घ्यावयाचे आहेत ? तुम्हांला देवत्व मिळवायचें आहे ? मग भावाला गच्च मिठी मारा. कशावर तरी बळकट श्रद्धा ठेवा.

कितीही संकटें आलीं तरी श्रद्धेची नाव तुम्हांला यशस्वी रीतीनें पैलतीराला घेऊन जाईल हें निश्चित समजा.

बाबानीं तुमची श्रद्धा कशावर आहे हें पाहिलें नाहीं. तुमच्याठायीं जिवंत रसरशीत श्रद्धा आहे कीं नाहीं हेंच पाहिलें व आजही ते त्याच दृष्टीनें पहात आहेत. तुमची श्रद्धा श्री साई सच्चरितावर आहे कीं गुरुचरित्रावर आहे, या गोष्टीला त्यांनीं महत्त्व दिलें नाहीं. त्यानीं महत्त्व दिलें जातिवंत, जिवंत श्रद्धेला.

'कोणास अध्यात्म रामायण। कोणास ज्ञानेश्वरी पुरश्चरण। कोणास हरिवरदा पारायण। गुरुचरित्रावलोकन कोणातें॥ कोणा बसविती पायाजवळी॥ कोणास खंडोबाच्या देऊळीं। कोणाच्या विष्णु सहस्रनामावळी। बांधिती गळीं कळकळीनें॥'

किती व्यापक व सर्वव्यापी क्षेत्र आहे हें! प्रत्येकाची आवड निवड कांहीं सारखीं नसते. व्यक्ति तितक्या प्रकृति! कोणाला काय आवडतें तर कोणाला काय आवडतें! परंतु आवडी निवडी भिन्न व वेगवेगळ्या असेनात का. त्या सर्वांना व्यापून रहाणारा सर्वांनाच एकाच सूत्रांत गोवणारा व जरूर त्या राजमार्गावर आणून सोडणारा एक महत्तम गुण आम्यावर असला म्हणजे झालें. आणि तो महान् गुण म्हणजेच भाव किंवा श्रद्धा. तुम्हांला देवत्वाप्रत घेऊन जाणारी खात्रीची व सर्वश्रेष्ठ शिडी म्हणजे श्रद्धाच होय.

× × ×

श्री साईबाबासंबंधींचा भक्तिभाव उत्तरोत्तर वाढत चालला आहे. त्यांच्यासंबंधीं कुठें कांहींही असो; त्याकडे सहाजिकच भक्तगण मोठ्या प्रमाणांत आकर्षिला जातो. त्यामुळें कित्येक लोकांस आपला स्वार्थ साधण्यास ही उत्तम संधि आहे असें वाटतें. त्यांच्या नांवाचा फायदा मिळविण्यासाठीं कांहीं ना कांहीं हालचाली नेहमीं चाललेल्या असतात. कोणी 'साई दरबार' भरवितात, 'द्वारकामाई' उभी करतात तर कोणी काय करतात. अशा या प्रयत्नांशीं श्रीसाईबाबांच्या शिरडी संस्थानचा कोणत्याही प्रकारें संबंध नसतो. श्री साईबाबांच्या किंवा द्वारकामाईच्या नावानें कोणी कांहीं करूं लागला तर कोण कोणाचा हात धरूं शकत नाहीं; परंतु कोणाही साईभक्ताचा वृथा गैरसमज होऊं नये व साईबाबांच्या शिरडी संस्थानचा अशा प्रकारांशीं संबंध आहे असें उगाच कोणाला वाटूं नये, एवढ्यासाठीं हा जाहीर खुलासा करण्यांत येत आहे — **संपादक**

———






## एक साधा परंतु अर्थपूर्ण अनुभव

श्री. के. के. देसाई, सेंट पिटर्स हायस्कूल, पंचगणी, जि. उ. सातारा; हे लिहितात कीं, मी माझा एक साधाच पण अर्थ भरलेला अनुभव पाठवीत आहे; तो प्रसिद्ध करण्यास योग्य असल्यास प्रसिद्ध करावा तो असा.

माझ्या शाळेला उन्हाळ्याची पंधरा दिवसांची सुट्टी पडली होती. सुट्टींत कोल्हापुरला जावें असें म्हणत होतों. जाण्याची घाई होती. सुटी दि. ५ ते १९ पर्यंत होती. परीक्षा ४ पर्यंत संपत नव्हती. त्यामुळें दि. ७, ८ पर्यंत निघण्याचें शक्य दिसत नव्हतें. तरी पण प्रयत्न म्हणून माझ्या साहाध्यायांना पेपर तपासून लौकर देण्याबद्दल विनंती केली. मला तें शक्य दिसत नव्हतें; तरी पण बाबांना विनंती केली आणि अशक्यांतलें शक्य झालें. मला पेपर तपासून मार्क मिळाले आणि मी दि. ६ ला निघूं शकलों.

दुसरें असें कीं, मी सकाळीं कोल्हापूरला जातांना सातारला गाडी बदलावी लागते. मला गाडींत समजलें कीं, लग्नाचा मोसम आहे जागा मिळणें शक्य नाहीं आणि तें खरेंहि होतें. ज्याप्रमाणें पहिलें संकट बाबांनीं सांवरलें त्याचप्रमाणें बाबा हेंहि संकट घालवतील अशी पक्की खात्री होती. माझा तोच एकमेव आधार होता. मी मनोभावें प्रार्थना करून त्यांना अडचण सांगितली. मी साताऱ्याला ११–२५ वाजतां आलों. पुणें–कोल्हापूर गाडी तयार होती. आणि दाराजवळ २५–३० माणसांचा घोळका उभा होता. जागा मिळणें शक्यच नाहीं ही खात्री झाली. पण बाबांचा चमत्कार पहावयाची ती वेळ होती. पुणें–कोल्हापूर तिकीट काढलेला एक माणूस कांहीं कामामुळें पुढें जाऊं शकत नव्हता. मला आपणहून तिकीट विचारलें. मी तर चाटच पडलों. बाबांनीं माझ्या हांकेला ओ दिली होती. तिकिटाचे पैसे देण्याकरतां मी गडबडीनें त्याला जास्त पैसे दिले. पण त्या बाबारूपी सद्‌गृहस्थानें जास्त गेलेले पैसे मला हांक मारून परत दिले. गाडींतील सर्व प्रवासी आश्चर्यानें थक्क झाले होते. त्यांना बाबांच्या ह्या चमत्काराची कल्पना नव्हती. मीच फक्त तो चमत्कार जाणत होतों. गर्दींमध्यें २५–३० माणसें असतांना फक्त मलाच तिकीट पाहिजे का म्हणून विचारणारा गृहस्थ बाबांच्या कृपेमुळें लाभला असें दर्शवितें. त्या गृहस्थाच्या रुपानें बाबाच मला भेटले. मला बसायला त्यानें रिझर्व्ह केलेली जागाच मिळाली. श्रीबाबांचा लीला अगाध आहे म्हणतात तें कांहीं खोटें

नाहीं. गाडींत बसल्यावर बाबा मला लौकर जायचें आहे पोंचवाल ना ? म्हणून केलेली विनंती बाबानीं अक्षरशः पाळली. नेहमींप्रमाणें २–३० ला पोहोंचणारी गाडी १–१० लाच कोल्हापुरास पोहोंचली. प्रवासांत मी त्यांचा चरित्र ग्रंथ वाचीत होतों.

असे लहान मोठे अनुभव मी घेतलेले आहेत. पण भक्त मंडळींना बाबांच्या जाग्रतपणाची जाणीव देण्यासाठीं म्हणून मी वरील अनुभव सांगितला आहे.

× × ×

## साईबाबा देगा, हम लेगा—

श्री. वा. रं. गोखले, व्हल्कन इन्शुअरन्स कं. पुणें शाखा, पुणें २ हे लिहितात कीं,

पुढील घटना सुमारें दोन वर्षांपूर्वी घडलेली असून, त्यावेळीं मी शिरडी येथें रहात होतों. श्रीक्षेत्र शिर्डी येथें यात्रा बरीच जमलेली होती. सकाळपासून भक्तांची मुंग्यांसारखी रांग श्रीबाबांच्या दर्शनाकरितां लागून राहिली होती. सकाळीं ८ वाजण्याच्या सुमारास एक वृद्ध बाई वय अदमासें ७०–७२ असलेली लेंडी बागेपासून समाधी-मंदिराच्या प्रवेशद्वारापर्यंत सारख्या फेऱ्या मारूं लागली व तोंडानें 'साईबाबा देगा हम लेगा–तुम क्या देगा हम क्या लेगा' सारखे म्हणूं लागली. त्यांत मुळींच खंड पडत नव्हता. वाढत्या गर्दींमुळें पोलीसांनीं तिला हांकलून लावण्याचा प्रयत्न केला. तरीहि लेंडी बागेपासून सगुण मामा नाईकांच्या दुकानापर्यंत ती फेऱ्या मारूं लागली. फेऱ्या न थांबतां सारखी मारीत होती. दुपारीं १२ वाजले, २ वाजले भक्तांनी तिला खाण्याचा आग्रह केला, कोणी चहा देऊं लागले. कोणी काय पाहिजे म्हणून विचारूं लागलें. पण त्याकडे ती नुसती बघायला सुद्धां तयार नव्हती. दुपारी ४ चे सुमारास एक साईभक्त स्वतःची गाडी घेऊन शिर्डीस आले. बाबांना हार घातला. व दर्शन घेऊन मुंबईस परत जाण्यास निघाले. गाडी कोपरगांव येथें गेली असेल. तों त्यांनीं गाडी परत शिर्डीस आणली ( काय झालें असेल तें त्यांचें त्यांना ठाऊक ) व थेट त्या फेऱ्या मारणाऱ्या बाईच्या जवळ आणून उभी केली व तिला विचारलें, 'तुझा सवाल काय आहे?' बाईनें तोंड उघडलें व सांगितलें माझा सवाल ६१ पावल्यांचा आहे. त्या गृहस्थानें ६१ पावल्या त्या बाईला दिल्या व तो मुंबईचा मार्ग क्रमूं लागला. ती बाईही ६१ पावल्या मिळतांच तोंडानें 'साईबाबा देगा हम लेगा, तुम क्या देगा हम क्या लेगा' म्हणत शिर्डीतून बाहेर पडली ती पुन्हा शिर्डीस दिसली नाहीं.

× × ×

## उदीचा प्रभाव

सौ. नीला एन्. चौबळ C/o एन्. जी. चौबळ, अकाउंटंट जनरल ऑफिस, क्वीन्स रोड, मुंबई नं. १, ह्या लिहितात—

१९५३ सालीं मे महिन्यांतील एक अनुभव येथें सांगत आहे. १९५२ सालीं मी मॅट्रीक पास झालें व त्यानंतर कांहीं तरी उद्योगाला लागावयाच्या बेतांत होतें. शक्यतों

नोकरीच पत्करावी अशा विचारांत होतें. परंतु पास झाल्यावर मग बरेच दिवस म्हणजे जवळ जवळ वर्षभर घरींच बसावें लागलें. कारण नोकरी कांहीं मिळाली नाहीं व मन अस्वस्थ झालें. कारण मनाला विरंगुळा कांहींतरी हवा होता ना? इतर गोष्टींत लक्ष घालण्यांस मन तयार नव्हतें.

अशा प्रकारें दिवस जात असतां मला हळुहळू एकाकी कांहीं कारण नसतां ताप येऊं लागला. प्रथम प्रथम माझ्या तें लक्षांत आलें नाहीं. परंतु पुढें जेव्हां ताप वाढूं लागला तेव्हां त्याची जाणीव होऊं लागली. घरच्या मंडळींनीं माझी तब्येत आमच्या खाजगी डॉक्टरांस दाखविली. डॉक्टरांनीं ताप साधाच आहे असें सांगून औषध वगैरे दिलें. परंतु औषधानें ताप हटेना. तेव्हां त्यांनीं इंजेक्शनें सुरू केली. तरी ताप रोज येत होता. शिवाय सुरुवातीला अंगावर ताप काढल्या-वर मात्र मनांतून मी फार घाबरून गेलें होतें. दिवसेंदिवस मला भयंकर अशक्तपणा वाढूं लागला. व दुखणें कोणत्या तरी रोगावर जातें कीं काय याची काळजी वाढूं लागली. खाणें पिणें तर कांहींच जात नव्हतें व उठून बसण्याचीसुद्धां ताकद राहिली नाहीं. डॉक्टरसुद्धां मनांतून आश्चर्य करूं लागले.

अशा प्रकारें बऱ्याच दिवसांनंतर माझ्या तापाला उतार पडत चालला. परंतु अशक्तपणा इतका वाढत चालला होता कीं, नुसती पावलें टाकीत असतांनासुद्धां हात पाय थरथरायचे. ही काय भानगड आहे याचें मला आश्चर्य वाटूं लागलें. औषध पाणी तर चालूं होते. मी मनांतून बाबांची सारखी करुणा भाकत असें. कारण शिरडीस जाऊन आल्यापासून बाबांवर माझी पूर्ण श्रद्धा बसली होती. त्यामुळें औषध पाण्याला कंटाळून आतां कोणतेंच औषध घ्यावयाचें नाहीं व एकाच औषधावर विश्वास ठेवायचा आणि तें म्हणजे श्री बाबांची उदी. कारण आजपर्यंत श्री साईबाबांच्याच कृपेनें सर्व ठीक चाललेलें आहे. खरोखर बाबांची लिला अगाध आहे.

एके दिवशीं सहज बाबांच्या तसबिरीजवळ हात जोडून मी उभी राहिलें व म्हटलें बाबा आतां तुमच्या उदीशिवाय दुसरें औषध दिसत नाहीं. (कारण डॉ. च्या औषधानें आराम वाटत नव्हता.) तेव्हां आजपासून मी तुमची विभूति पाण्यांत घालून घेत जाईन. आणि ती घेऊन तरी मला बरें वाटलें पाहिजे! अशी बाबांजवळ मनापासून प्रार्थना केली. तेव्हांपासून मी दररोज उदी पाण्यांत घालून घेण्यास सुरवात केली. आणि काय आश्चर्य! माझी प्रकृति हळूहळू सुधारत जाऊन प्रकृतीला थोडासा आराम पडूं लागला. मनांतू बाबांचें सारखे आभार मानूं लागलें. आणि आज बाबांच्या कृपेनें माझी प्रकृति चांगली आहे. किरकोळ आजाराखेरीज मोठें दुखणें वगैरे कांहीं झाले नाहीं. व आपण ह्या आजारांतून बरे होऊं की नाहीं ही जी मनांत शंका होती ती पार नष्ट झाली, ही सर्व बाबांचीच कृपा. त्यानंतर एकच वर्षानें माझें लग्न जमून मला चांगलें स्थळ मिळालें. व आतां एका मुलीसह मी सुखांत आहे. खरोखर बाबांचा महिमा

वर्णावा तेवढा थोडाच आहे. जो जो भज भजे जैशा जैशा भावें ।तैसा तैसा पावे मीही त्यासी ह्या बाबांच्या वचनाचें प्रत्यंतर माझ्या बाबतींत तरी खरे ठरलें आहे.

× × ×

**नवस फळाला आला —**

श्री. प्रभाकर कृष्णाजी उपरकर बे. ल. चाळ, ३ रा माळा, खो. नं. ३३६; ७५ बेलव्हेडर रोड माझगांव मुं. नं. १० हे लिहितात कीं, मी एक साईसेवक आहें. मला श्री. साईबाबांकडून बरेच अनुभव मिळाले आहेत. त्यांपैकीं दोन अनुभव मी देत आहे:—

मी ज्यावेळीं नोकरी करून शिकणारा विद्यार्थी होतों त्यावेळची ही हकीकत आहे. मी पहिल्या वेळेस म्हणजे मार्च १९५६ मध्यें एस. एस. सी. परीक्षेस बसलों आणि नापास झालों. त्यानंतरही लागोपाठ ३ वेळां परीक्षेस बसलों. परंतु पास होण्याचें चिन्ह कांहीं दिसेना, हें पाहून मला फार वाईट वाटे व मला माझ्या आईनें सांगितलेली गोष्ट आठवूं लागे. ती म्हणजे आम्ही गांवीं असतांना तिला एका ज्योतिष्यानें असें सांगितलें होतें कीं माझें शिक्षण वयाच्या १४ वर्षांपर्यंत सुरळीत होईल त्यानंतर मी अधिक शिकेन असें सांगतां येत नाहीं. परत मी १९५९ मार्चला म्हणजेच वयाच्या २३ व्या वर्षी परीक्षेस बसण्याचें ठरविलें, तेव्हां माझे आई वडील दोन तीन ज्योतिष्यांकडे गेले व माझ्याबद्दल विचारलें तर त्यांनी सांगितलें कीं जर तुम्ही ग्रहशांति करितां जप व दान वगैरे कराल तर कदाचित् हा पास होऊं शकेल, नंतर माझे वडील त्यांचे गुरु डॉक्टर के. म. गव्हाणकर ( कुर्ला ) यांच्याकडे गेले व त्यांना माझी जन्मपत्रिका दाखवून त्यांस विचारलें कीं माझा मुलगा. परत परीक्षेस बसणार आहे तरी त्याबद्दल तुम्हास काय वाटतें ? तेव्हां पत्रिकेवरून त्यांनीं सांगितलें कीं हा कांहीं पास होणार नाहीं. कारण याच्या जन्मग्रहीं राहू आहे;परंतु जरा तुम्ही पत्रिकेचा विचार सोडून बाबांवर श्रद्धा ठेवलीत तर मागें तुम्हास अनुभव आले त्याचप्रमाणें तुमचा मुलगा पास होईल, परंतु त्याला मात्र पत्रिकेची हकिकत सांगूं नये व त्यास प्रयत्न व बाबांची सेवा चालू ठेवण्यास सांगणें. त्याप्रमाणें आई–वडिलांनीं मला बाबांची सेवा व (अभ्यासाचा) प्रयत्न चालू ठेवण्यास सांगितलें. नंतर मी बाबांना असा नवस केला कीं मी पास झाल्यावर शिर्डीस येवून ५नारळाचें तोरण बांधीन व १ रत्तल खडीसाखर वाटीन. त्याचप्रमाणें मी चहा सोडला व पास झाल्यानंतर शिर्डीस जाऊन समाधीचें दर्शन घेतल्यावर चहा पिण्याचें सुरू करावयाचें असा संकल्प केला. तसेंच माझ्या आईनेंही मी पास व्हावें म्हणून चहा सोडला व वरील प्रमाणेंच संकल्प केला.

त्या नंतर बाबांच्या कृपेनें मी मार्च १९५९ च्या परिक्षेंत पास झालों. मी व आई जुलै १९५९ मध्यें शिर्डीस जाऊन नवस फेडले. शिर्डीस गेल्यावर मी बाबांना प्रार्थना केली कीं जर मला २५ डिसेंबर १९५९-च्या पूर्वी क्लार्कची नोकरी मिळाली तर

मी २५ डिसेंबरच्या आंत परत शिर्डीस येऊन समाधीचें दर्शन घेईन. नंतर मी मुंबईस परत आल्यावर साईचरित्र वाचण्यास आरंभ केला. चरित्र वाचून पूर्ण झाल्यानंतर क्लार्कची नोकरी मिळाली. नंतर मी ता. २०–१२–५९ रोजी शिर्डीस जाऊन समाधीचें दर्शन घेतलें व मागील वेळेस विस्मृती मुळें ५ नारळांचें तोरण बांधण्याचा व खडी-साखर वाटण्याचा नवस राहिला होता तो फेडला.

या पूर्वीची नोकरी सुद्धा मला बाबांच्या कृपेनें मिळाली होती, त्यावेळीं माझ्या बहिणीनें बाबांच्या चरित्रांचें ७ दिवसांत ( सप्ताह ) पारायण केलें होतें.

अशी आहे आमुची साई माउली । सेवकांवरी असे नेहमी कृपेची साउली ॥

= = =

## शरीर स्वास्थ्यासाठीं प्रार्थनेची जरुरी

मानवी जीवनांत प्रार्थनेचें महत्त्व फार मोठें आहे. जीवन उत्तम प्रकारें जगायचें तर त्याला प्रार्थनेच्या संस्कारांत गुरफटून ठेवलेंच पाहिजे. आत्म्याच्या उन्नतीसाठीं, हृदय उल्हसित रहाण्यासाठीं, भावना चेतविण्यासाठीं प्रार्थनेची जरुरी फार आहे. रोज श्रमणाऱ्या, भागणाऱ्या जीवाची प्रार्थना ही विश्रांति आहे. शरिराला रोज द्यावें लागणारें तें एक अन्नच आहे म्हणा ना. तें जसें आवश्यक अन्न आहे, तसेंच शरिरांतील मळ धुवून काढणारें पवित्र गंगास्नानही आहे.

आपण स्नान कशासाठीं करतों ? निर्मळ व स्वच्छ होण्यासाठींच कीं नाहीं ? त्याच-प्रमाणें प्रार्थनेचीही फार जरुरी आहे. मनांत नाना प्रकारच्या वासना उद्भवतात, थैमान घालतात त्यांना शांत करण्यासाठीं, तें थैमान थांबविण्यासाठीं प्रार्थनेची जरुरी आहे. शारीरिक श्रम केल्यानंतर झोपेची व विश्रांतीची जरुरी भासते व ती आपण घेतोंही. त्याचप्रमाणें नाना प्रकारच्या वासनांच्या आहारीं गेल्यानंतर व नाना संकल्प, विकल्प करून थकल्या-भागल्यानंतर प्रार्थनेची कांस धरणें अत्यावश्यक आहे. शरीर धारणेसाठीं आपणास रोजच्यारोज अन्न घ्यावें लागतें, एकदांच घेऊन भागत नाहीं; त्याचप्रमाणें अंतःकरणांतील खळबळ, मळमळ व तळमळ थांबविण्यासाठीं शरिराला प्रार्थनेचें पक्वान्न वारंवार पुरवीत राहिलें पाहिजे.

— काका कालेलकर

# ना. बाळासाहेब सावंत यांचें अभिनंदन

गेलीं तेरा वर्षे शिरडी संस्थान समितीचें अध्यक्षपद उत्तम प्रकारें शोभविणारे त्याच प्रमाणें गेलीं ८–९ वर्षे संस्थानच्या विश्वस्त पदावर असलेले श्री. पी. के. ऊर्फ बाळासाहेब सावंत यांची नवमहाराष्ट्राच्या मंत्रिमंडळांत निवड झाल्याबद्दल शिरडी संस्थान समीतीला त्याबद्दल सहर्ष अभिमान वाटणें स्वाभाविक आहे.

शिरडी संस्थान समितीची एक सभा मुंबईत संस्थानच्या कचेरींत दिनांक ७ मे १९६० रोजीं भरली असतां ना. बाळासाहेब सावंत हे त्या सभेस हजर राहिले होते. त्यावेळीं समीतीचे उपाध्यक्ष श्री. बाजीराव कोते पाटील यांनीं त्यांच्या अभिनंदनपर भाषण करून त्यांना भव्य पुष्पहार व पुष्पगुच्छ समितीतर्फे अर्पण केला. श्री. बाजीराव पाटील आपल्या अभिनंदनपर भाषणांत म्हणाले, 'ना. बाळासाहेब यांची मंत्रिमंडळांत निवड यापूर्वीच होणें उचित झालें असतें. परंतु उशिरां का होईना, आमच्या महाराष्ट्र सरकारनें त्यांची आजवरची निरलस लोकसेवा, जनतेच्या उन्नतीसाठीं त्यांनीं चालविलेलें अविश्रांत कार्य वगैरे गोष्टी लक्षांत घेरून त्यांना मंत्रिमंडळांत घेऊन त्यांच्या सेवेचा जो गौरव केला त्याबद्दल आम्हां सर्वांना आनंद होत आहे. शिरडी संस्थान समितीचे अध्यक्ष व विश्वस्त या नात्यानें त्यानीं आजवर आपली जबाबदारी अत्यंत उत्तमप्रकारें पार पाडिली व समितीचें वेळोवेळीं अचूक मार्गदर्शन केलें यावद्दल त्यांना द्यावे तेवढे धन्यवाद थोडेच होतील. यापुढें आपली अधिकार कक्षा संभाळून ते आमचें मार्गदर्शन करतील व आपल्या ज्ञानाचा फायदा संस्थान समितीला वेळोवेळीं देत राहतील, अशी आशा मी याप्रसंगीं प्रगट करतों.'

यानंतर ना. बाळासाहेब सावंत हे उत्तरादाखल केलेल्या आभारप्रदर्शक भाषणांत म्हणाले, 'आपण केलेल्या गौरवाबद्दल मी आपला आभारी आहे. मला मंत्रिमंडळांत जी जबाबदारीची व मानाची जागा मिळाली ती पूज्य बाबांचीच कृपा होय, असें मी मानतों. नवीन जबाबदारीमुळें संस्थान समितीच्या अध्यक्षपदाचा मी जरी राजिनामा दिला असला तरी सध्या माझ्यावर जी जबाबदारी सोपविण्यांत आली आहे, ती संभाळून व अधिकाराची कक्षा संभाळून शिरडी संस्थानसाठीं मला जें कांहीं करतां येण्यासारखें असेल तें मी जरूर करीन. आपल्या आजवरच्या सहकाराबद्दल व आपण केलेल्या गौरवाबद्दल मी आपला सर्वांचा आभारी आहें.'

त्यानंतर अल्पोपहार होऊन अर्ध्या तासानंतर सर्वांचा प्रेमळ निरोप घेऊन ना. बाळासाहेब सावंत दुसरीकडे निघून गेले.

वर नमूद करण्यांत आल्याप्रमाणें शेतकी खात्याचे मंत्री ना. बाळासाहेब सावंत यानीं शिरडी संस्थान समितीच्या सन्माननीय अध्यक्षपदाचा राजिनामा दिला असून समितीनें त्यांच्यावरील सरकारी जबाबदारी लक्षांत घेऊन तो मोठ्या खेदानें स्वीकारला आहे.

---

# सीतामाईचें उज्वल चारित्र्य

लेखकः—**स. म. ठाकूर** बी. ए. एल्. एल्. बी.

वाल्मीकिरामायणाचे आधारावर सीतामाईचें हें चरित्र लिहावयाचें असल्यामुळें वाल्मीकिऋषींनी रामायणाच्या प्रत्येक कांडांत सीतामाईबद्दल जे उल्लेख केलेले आहेत त्यांना अनुसरून तिच्या चारित्र्याचें क्रमवार अवलोकन करण्याचें योजिलें आहे.

**बालकांड**—सदर कांडांत सीतामाईबद्दल विशेष मजकूर आलेला नाहीं. फक्त सर्ग ७० ते ७३ मध्यें सीतामाईच्य विवाहाचा मजकूर आला आहे. सदरचा मजकूर वाचतां सीतामाईचा रामचंद्रप्रभूंशीं जो विवाह झाला त्याला स्वयंवर म्हणणें हें चुकीचें होईल असें दिसतें. मोठे मोठे किर्तनकार कीर्तनाच्या वेळीं सीतास्वयंवराचें आख्यान लावतात व सीतेच्या स्वयंवराकरितां जनकराजानें दुसऱ्या अनेक राजेरजवाड्यांना आमंत्रणें पाठविलीं होतीं व त्या आमंत्रणांस अनुसरून अनेक देशचे राजे सीतेच्या पाणीग्रहणाच्या आशेनें स्वयंवराकरितां मिथीला नगरींत जमा झाले होते व त्यांत लंकाधिश रावण व अयोध्येचा रामचंद्र हेही होते. अवाढव्य शिवधनुष्य दृष्टीस पडतांच अनेक राजांनीं खालीं माना घातल्या व तें उचलण्याचा प्रयत्न करण्याचा विचारच सोडून दिला. रावणानें तें उचलण्याचा प्रयत्न केला परंतु तें त्याला उचलतां आलें नाहीं उलट तो खालीं पडून तें त्याच्या उरावर पडलें. एकट्या रामचंद्रप्रभूंनीं मात्र तें उचलून सज्ज केलें अशी कथा कीर्तनामध्यें रसाळ वाणीनें सांगितली जाते व पुराणांत आणि कांहीं रामायणांतही ह्या कथेला पुष्टी मिळते. याठिकाणी स्वयंवर शब्दाच्या मूळ अर्थाचा कोणीच विचार केलेला दिसत नाही. स्वयंवर शब्दाचा अर्थ कन्येनें आपल्या आवडीप्रमाणें वराची निवड करावयाची व त्याला वरावयाचें असा आहे.

शिवधनुष्य सज्ज करण्याचा पण सीतेचा नसून जनक राजाचा होता. जो कोणी सदर पण जिंकील त्याला वरणें सीतेला प्राप्त होतें. रामानें पण जिंकला तिनें रामाला वरलें. रावणानें पण जिंकला असता तर रावणाला तिनें वरलें असतें. सीतेच्या आवडीनिवडीला त्यांत मुळींच महत्त्व नव्हतें व म्हणून सीतेनें रामाशीं जो विवाह केला त्याला स्वयंवर म्हणणें चुकीचें होईल; त्याला फार तर ' समाव्हय ' असें म्हणतां येईल. कारण ' निर्जीव वस्तु पणाला लावून जें केलें जातें तें ' द्यूत ' व सजीव वस्तु पणाला लावून जें केलें जातें तें ' समाह्वय ' होय. ' अशी व्याख्या मनुस्मृतींतील अध्याय ९ श्लोक २२३ मध्यें दिली आहे. कायद्याच्या भाषेंत बोलावयाचें म्हणजे सीता ही सजीव वस्तु होती व ती तिच्या बापानें पणाला लावली होती. या कारणास्तव सीतेचा रामचंद्राशीं झालेला विवाह हा ' समाह्वय ' आहे स्वयंवर नव्हे. व म्हणून सीता स्वयंवर असा शब्दप्रयोग करण्याऐवजीं ' सीता समाव्हय ' असा शब्द प्रयोग करणें युक्त होईल. शिवाय वाल्मीकी

रामायणांत रावण व इतर राजे त्यावेळीं स्वयंवराकरितां जमले होते असा कोठेंच उल्लेख नाहीं.

जनकराजा एक यज्ञ करीत होता. तो यज्ञ पाहण्याकरितां रामचंद्रप्रभूंना बरोबर घेऊन विश्वामित्र ऋषि मिथीला नगरींत गेले व तेथें शिवधनुष्य पहाण्याची त्यांना इच्छा झाल्यामुळें जनकानें तें त्यांना दाखविलें व आपल्या पणाची माहिती दिली. रामचंद्राप्रभूंनीं तें सहाजिक पाहिलें व सज्ज केलें; अशा तऱ्हेनें रामचंद्रप्रभूनीं पण जिंकल्यामुळें जनकराजा फार आनंदित झाला व पुढें सीतेचा व रामाचा विवाह झाला असें साधें, सरळ वर्णन वाल्मीकि रामायणांत आलें आहे. शिवाय त्यावेळीं सीतेचें वय फक्त ६, ७ वर्षांचेंच होतें. इतक्या लहान वयांत मुलीस लग्नाची कल्पना असणें व कोणता वर योग्य व कोणता अयोग्य हें ठरविण्याइतकीं तिची बुद्धि प्रगल्भ असणें शक्य नाहीं. ह्या एकंदर कारणां-वरून सीतास्वयवंर असा शब्दप्रयोग आपण उपयोगांत आणीत असतों तो चुकीचा आहे हें स्पष्ट होईल.

**अयोध्याकांड**—या कांडामध्यें सीतामाईच्या चरित्राचा जो भाग आला आहे, त्या भागामध्यें (१) तिचें अतुलनीय पतिप्रेम (२) तिचें आनंदानें हूरळून जाणारें व दुःखानें उद्विग्न न होणारें खंबीर मन व (३) तिचें असामान्य बुद्धिकौशल्य हे तीन गुण प्रामुख्यानें चमकतांना दिसतात. आपल्या पतीला आतां लौकरच राज्याभिषेक होणार, आपण अजूनपर्यंत दशरथाची सुना होतें त्याऐवजी आतां आपणाला राम-राजाचें राज्ञीपद मिळणार, आपला पति अजूनपर्यंत नुसता युवराज होता आतां तो अयोध्येच्या सिंहासनावर बसणार, अशा आनंदाच्या विचारांत सीतामाई असतांनाच रामचंद्रप्रभू तिच्या भेटीस आले व १४ वर्षे वनवासाला जात आहें. भरताला राज्या-भिषेक व्हावयाचा आहे, तूं येथेंच अयोध्येंत रहा व देवाची, माता कौसल्येची, तात दशरथाची व भरताची सेवा कर असें त्यांनीं तिला सांगितलें.

इंद्राच्या सुंदर नंदनवनांत अगर काश्मीरच्या रम्य शालीमार बागेंत किंवा म्हैसूरच्या नयनमनोहर वृंदावन गार्डनमध्यें वास्तव्य करावयास आपणास मिळणार अशा विचारानें एखाद्यानें आनंदित असावें, तोंच सहाराच्या ओसाड वाळवंटांत अगर अंदमान निकोबारच्या निर्जन प्रदेशांत जाऊन रहाण्याचा प्रसंग यावा म्हणजे त्या इसमाच्या मनाची जशी स्थिती होईल किंवा ऋषिकेशच्या गंगातटाकीच्या स्वामी शिवानंदाच्या रम्य कुटींत, पांडीचरीच्या पवित्र आश्रमांतील पूज्य माताजींच्या सान्निध्यांत अगर थिऑसॉफिकल सोसायटीच्या अड्यार येथील शांत, गंभीर व पवित्र प्रार्थनामंदिरांत अगर तेथील वटवृक्षाखालीं जाऊन रहाण्याचें एखाद्या संसारत्रस्तानें ठरवावें तोंच वित्त, वनीता व वारुणी ह्यांच्या समुद्रांत २४ तास घालविणाऱ्या एखाद्या आसूरी व तामसी वृत्तीच्या जनसमुहांत अडकून पडण्याचा त्याच्यावर प्रसंग यावा, तशाच तऱ्हेचा दुर्धर प्रसंग रामचंद्राच्या बोलण्यानें सीतामाईवर आला होता. परंतु सीतेचें मन खंबीर होतें, आपल्या पतीला राज्याभिषेक होणार म्हणून तें पूर्वी हुरळून गेलें नाहीं व आपल्या पतीला

आतां १४ वर्षांचा खडतर वनवास प्राप्त होणार या दुःखद वार्तेनें त्यावेळीं कष्टी अगर दुबळें झालें नाहीं. तिनें आपला धीर सोडला नाहीं. तिच्या डोळ्यांत एकही अश्रुबिंदु आला नाहीं. उलट पक्षीं तुम्ही अरण्यांत जाणार तर मीही तुमच्या बरोबर अरण्यांत येतें असें तिनें आपल्या पतिला सांगितलें.

रामचंद्रप्रभु हे लहानपणीं विश्वामित्र ऋषीबरोबर अरण्यात राहिले होते व म्हणून तेथील गुहांत राहणारी वाघ–सिंहादि भयंकर हिंस्र श्वापदें तेथील रस्त्यावरून जातांना वारंवार दृष्टीस पडणारीं नाग, सर्प वगैरे विषारी जनावरें, तेथील नद्यांतील पाण्यांत व त्यांच्या कांठावर असणाऱ्या अजस्र सुसरी, मनुष्यभक्षक राक्षस वगैरेंची त्यांना पूर्ण कल्पना होती. तेथें रहावयास आश्रयाकरीतां घर मिळणार नव्हतें. खावयास अन्न मिळण्याची मुश्किल होती. वस्त्राकरितां वल्कलाशिवाय मार्ग नव्हता. ह्या सर्व गोष्टी त्यांनी पूर्वीं अनुभवल्या होत्या व त्या त्यांनीं सीतामाईला समजावून सांगितल्या व तूं माझ्याबरोबर वनवासास येऊं नको. मी तुला आपल्या बरोबर नेणार नाहीं असें तिला निक्षून सांगितलें. परंतु रामचंद्राच्या या सांगण्याचा सीतामाईच्या मनावर कांहींच परिणाम झाला नाहीं. तिचें आपल्या पतीवरील प्रेम अढळ होतें. पतीच्या सहवासांत आपणास राहावयास मिळावें व त्याची सेवा करावयास मिळावी त्याकरितां आपणावर कितीही संकटें आलीं तरी त्यांची पर्वा करण्याचें कारण नाहीं असें तिला वाटत होतें व म्हणून 'मी तुमच्याबरोबर येणार. तुम्हीं आपल्याबरोबर मला न नेल्यास प्राणत्याग करीन' असें तिनें आपल्या पतीस सांगितलें; परंतु तिची कोणतीच विनवणी रामचंद्र मान्य करीनात व अरण्यांत माझें एकट्याचेंच संरक्षण होणें कठीण तर तुला माझ्याबरोबर नेऊन काय करूं ? तुझें रक्षण कसें होणार व कोण करणार असें ते सीतामाईला म्हणाले. साध्या विनवण्यांनीं आपल्या पतीचें मन वळत नाहीं हें पाहून सीतामाई बेचैन झाली व आपल्या पतीचें मन कसें वळेल याचा ती विचार करूं लागली.

सीतामाई ही मुळचीच मोठी बुद्धिमान् असल्यामुळें त्या प्रसंगाला उपयोगी पडेल अशी तिला एक युक्ति सुचली व त्या युक्तीचा तिनें अवलंब केला. रामचंद्रप्रभु हे मोठे पराक्रमी होते. त्यांच्या पराक्रमाला जगांत तुलना नव्हती. एकबाणी म्हणून त्यांची सर्वतो-मुखी ख्याती झाली होती. लहानपणीं विश्वामित्राबरोबर असतांना व जनकन्या मंडपांत शिवधनुष्य उचलून त्यांनीं आपल्या पराक्रमाचा व शक्तीचा स्वतः अनुभव घेतला होता. अशा पराक्रमी पुरुषाच्या पराक्रमाला कमीपणा आणणारी कोणतीही गोष्ट तो कधींही घडूं देणार नाहीं अशी सीतेची खात्री होती व म्हणून ती रामचन्द्राला म्हणाली, 'अरण्यांत आपल्या पत्नीचें संरक्षण करण्याला लागणारें शौर्य व धैर्य हीं रामचन्द्रामध्यें नाहींत असें जर जनक राजाला कळलें तर आपला जावई हा पुरुषवेषधारी स्त्रीच होता, त्याला आपण मुलगी देण्यांत मोठी चूक केली असें तो म्हणेल व तुमच्या कीर्तीला काळीमा लागेल, याबद्दल मला अत्यंत वाईट वाटतें.'

किं त्वाऽमन्यत वैदेहः पिता मे मिथिलाधिपः
रामजामातरं प्राप्यस्त्रियं पुरुषविग्रहम् ॥ ३ ॥

( अयोध्याकांड सर्ग ३० श्लोक नंबर ३ )

'**अर्थः**—हे राम ! पुरुषरूप धारण करणारा आणि वस्तुतः स्त्री असलेला जामात मिळाल्यानें माझ्या मिथिलाधिप पित्याला अर्थात् जनकराजाला काय बरें वाटेल ?'

सीतेच्या या युक्तिवादाच्या बोलण्याचा योग्य तो इष्ट परिणाम झाला व आपल्या तोंडून निघालेला शब्द कधींही मागें न घेणारे एकवचनी राम पूर्वी ज्या सीतेला तूं माझ्याबरोबर येऊं नको म्हणाले त्याच सीतेला तूं माझ्याबरोबर ये असें म्हणाले. वरील एकंदर विवेचनावरून वनामध्यें भयंकर संकटें सोसावीं लागणार हें ठाऊक असतांनाही तेथें जाण्याची तयारी दाखवून रामचंद्राबद्दलचें तिनें दाखविलेलें पतिप्रेम तिच्या मनाचा खंबीरपणा व तिची असामान्य बुद्धिमत्ता हे गुण या कांडांत प्रामुख्यानें दिसतात.

---

—गेल्या ( मे ) श्री साई लीलेच्या अंकांत पान ३७ वर 'देणगीचा साभार स्वीकार' या मथळ्याखालीं प्रसिद्ध झालेल्या मजकुरांत देणगीदार सौ. सुमित्राबाई यांचें नांव केवळ चुकीनें सौ. सुमतीबाई असें छापलें गेलें आहे, तरी त्याऐवजीं सौ. सुमित्राबाई असें वाचावें अशी विनंती आहे.

---

## नवीन प्रकारचें 'बाबां'चें पाणाचित्र

'श्रीबाबां'च्या भक्तांकडून नव्या नव्या कल्पनांनीं चित्रें करण्याचे जे प्रयत्न होतात, त्यांतील एक अभिनव प्रयत्न आमच्याकडे अभिप्रायार्थ आला आहे. पूर्वी जपानी 'पाणचित्रें' ( Water-Pictures ) पुस्तकांवर चिकटविण्यासाठीं येत असत. त्याच शास्त्रीय सिद्धांतावर आधारलेलें हें 'बाबां'चें पाणचित्र कांच, धातू, लाकूड, प्लॅस्टिक, किंवा कोणत्याहि वस्तूवर कायम उमटवितां येतें.

एकदां पाण्यानें आरसा, तिजोरी ( कॅशबॉक्स ), कपाट, देव्हारा, यांवर हें पाणचित्र उमटवलें कीं तें 'ऑइलपेंटिंग'च असल्यानें, पाण्यानें किंवा धुताळण्यानें खराब होत नाहीं. वर्षानुवर्षे टिकून राहण्यासारखें हें पाणचित्र मुंबईच्या 'क्रोमोप्रिंट'नें तयार केलें आहे. तें करवून घेणारे साईभक्त श्री. बापूसाहेब करंदीकर यांची कल्पना अभिनंदनीय आहे. प्रचारासाठीं याची किंमत अति अल्प म्हणजे वीस नये पैसे ठेवण्यांत आली आहे.

[ एकमेव विक्रेते ! **विश्वनाथ अँड कं.**, नोबल चेंबर्स, पारसी बझार स्ट्रीट, मुंबई १ ]

---

# रमण महर्षींचा प्रसाद

**शिष्य:**—अध्यात्मिक अनुभवांपैकीं सर्वात महत्त्वाचा असा अनुभव कोणता !

**महर्षि रमण:**—आत्म प्रचीति. स्वतःची ओळख पटणें.

**शिष्य:**—विवाहित मनुष्याला आत्मानुभव घेतां येणें शक्य आहे का ?

**महर्षि:**—निश्चित. मनुष्य विवाहित असो वा अविवाहित असो; कोणतीही स्थिति आत्मप्रचीतीआड येऊं शकत नाहीं. प्रचीती घ्यायची ती येथें व याच जन्मीं. तसें नसतें व केव्हां तरी कोणत्या ना कोणत्या प्रयत्नांच्या सहाय्यानें तें साध्य गांठावयाचें असतें तर त्यामागें लागण्यांत मोठेंसें महत्त्व नव्हतें.

**शिष्य:**—मिठाची बाहुली समुद्रांत पोहत असली व तिच्या अंगावर वाटरप्रुफ कोट असला तरीही तिचें संरक्षण होणार नाहीं. ती वितळून जावयाची. या जगांत रोजच्या रोज माणसाला धडपडावें लागतें. आणि हें जग तर एखाद्या महासागरासारखें आहे.

**महर्षि:**—होय, शरिरांतील मन हेंही वॉटरप्रूफ कोटासारखें आहे.

**शिष्य:**—माणूस कामांत गुंतलेला आहे व त्याला कशाचीही इच्छा नाहीं; मग त्याला शांतता लाभेल का ? रोजच्या जीवनांत त्याला जीवन कलहास तोंड द्यावें लागतें. ध्यान धारणेला त्याला वेळच मिळत नाहीं. प्रार्थना करण्यापुरतीही त्याला फुरसत नसते.

**महर्षि:**—खरें आहे. कांहींतरी इच्छा, अपेक्षा बाळगून केलेल्या कामामुळें माणूस बंधनांत सांपडतो; परंतु निरिच्छ राहून केलेल्या कामामुळें तो बंधनांत सांपडत नाहीं; कार्य करीत असतां त्याचें मन खालीवर होत नाहीं. तो तोल सांभाळूं शकतो. मनाची शांतता राखूं शकतो. आपल्या कर्तव्यपालनांत गढून जाणें हाच देवाला केलेला खराखुरा नमस्कार होय...आणि भगवंताला आपल्या हृदयांत सिंहासन करून देणें हेंच खरें आसन होय.

**शिष्य:**—त्यासाठीं मी घरादाराचा त्याग करायला नको का ?

**महर्षि:**—तेंच जर दैवांत लिहिलें असेल तर हा प्रश्नच उद्भवत नाहीं.

**शिष्य:**—मग ऐन तारुण्यांत तुम्हीं आपल्या घरादाराचा त्याग कां बरें केला ?

**महर्षि:**—दैवांत जसें असेल, भगवंतानें जसा निर्णय घेतलेला असेल तसेंच घडून यावयाचें. त्याच्या इच्छेपुढें कोणाचेंही चालू शकत नाहीं. आम्हीं काय करायचें किंवा आमचें काय व्हायचें, हें प्रारब्धानें निश्चित करुन टाकलेलें असतें.

**शिष्य:**—आत्मारामाच्या शोधासाठीं मी माझा सर्व वेळ खर्च करावा हें योग्य आहे काय ? आणि तसें करणें शक्य नसल्यास मी स्वस्थ बसावें काय ?

**महर्षि:**—कोणत्याही गोष्टीच्या मागें न लागतां स्वस्थ बसून रहातां येत असेल तर ठीकच आहे; परंतु ते जर शक्य नसेल तर आत्मप्रचीतीचा प्रश्न

उद्भवतो त्यावेळीं स्वस्थ बसून रहाण्यांत फायदा कोणता? मनुष्याला जोंपर्यंत धडपडावें लागत आहे, जीवन संग्राम करावा लागत आहे; तोंपर्यंत त्यानें आत्मप्रचिती-साठीं जरूर ते प्रयत्न करण्याचें सोडून देतां कामा नये.

**शिष्य :** मोक्षासंबंधींच्या योजनेंत गृहस्थाचें स्थान कोणतें? मोक्षाची प्राप्ती व्हावी यासाठीं माणसानें गृहस्थाश्रमाचा त्याग करून संन्यासी वैरागी बनणें जरूर नाहीं का?

**महर्षि :** तुम्हीं गृहस्थ आहांत या नात्यानें विचार कां करतां? तुम्हीं संन्यास घेतला तरी संन्यासासंबंधीचे विचार तुमची पिच्छा पुरवितील. तुम्हीं गृहस्थाश्रम स्वीकारून संसारांत राहिलां किंवा त्याचा त्याग करून जंगलाचा मार्ग स्वीकारला तरी तुमच्या मनाची मगरमिठी कांहीं तुम्हांला मोकळा सोडीत नाहीं. अहंकार हा नाना विचारांस जन्म देणारा आहे. शरिरांत व जगांत त्यानें आपला पसारा पसरविलेला आहे. तोच मी गृहस्थ आहे याची तुम्हांला जाणीव देत रहातो. त्याचा ( गृहस्था-श्रमाचा ) त्याग केला तर त्याच्या जागीं संन्यासासंबंधीं विचार येऊन बसेल. संसाराच्या वातावरणांतून जंगलाच्या वातावरणांत किंवा कुठेंहि जा; मानसिक अडचणींचा डोंगर तेथें हजर असणारच. नवीन वातावरणांत त्यांची अधीकच वाढ होणार. सभोंवारची परिस्थिति बदलण्यानें काय होणार आहे? तुमच्या मार्गांत मुख्य धोंड आहे ती मनाचीच. संसारांत वावरा कीं जंगलांत वावरा, त्या मनावर ताबा मिळवितां आला पाहिजे. तें कार्य तुम्हीं अरण्यांत जाऊन करणार म्हणतां मग संसारांत राहून कां नाहीं? मग सभोंवारचें वातावरण बदलण्याची काय बरें जरूरी? तुम्हांला त्यामार्गानें जावयाचें आहे व त्यासाठीं प्रयत्न करावयाचे आहेत तर आतांच कां करीत नाहीं? सभोंवारचें वाता-वरण असेना का कोणत्याही प्रकारचें.

**शिष्यः**—जगाच्या व्यवहारांत वावरत असतां समाधि सौख्य घेता येणें शक्य आहे काय?

**महर्षिः**—'मी कार्य करतों' ही जाणीवच अंतराय आणणारी आहे. 'कार्य करणारा कोण?' असा प्रश्न तुम्हीं स्वतःला विचारा—तुम्हीं कोण अहांत, याची सतत जाणीव ठेवा. म्हणजे कार्यामुळें वाट्यास येणारें बंधन तुम्हांला चिकटणार नाहीं. आप भोगानें आपो-आप कार्य होत राहील. कार्य करण्यासाठीं किंवा कार्यत्याग करण्यासाठीं मुळींच धडपड करूं नका. त्यासाठीं कांहीं एक प्रयत्न करूं नका. त्या प्रयत्नांमागें लागणें, हें एक बंधनच आहे. तुम्हीं कितीही धडपड केली तरी जें घडावयाचें तें घडून येणारच. तुम्हीं काम करायचें नाहीं असें तुमच्या दैवांत असल्यास तुम्हीं कितीही आटापीट केली तरी कामकाजाशीं तुमचा संबंध येऊं शकणार नाहीं. आणि तुम्हीं अमूक काम करायचें हे तुमच्या दैवीं असल्यास तुम्हांला तें टाळतां येणार नाहीं. तें तुम्हांला करावेंच लागेल. तेव्हां ती जी महान शक्ती तिच्या वर सर्व सोपवून तुम्हीं स्वस्थ रहा. तुम्हीं तुमच्या मर्जीनुरुप एखाद्या कार्याशी संबंध जोडूं शकत नाही किंवा त्याचा त्यागही करूं शकत नाहीं, तुमचा नव्हे तो प्रांत

———

# माझा वेदांत

एकदां स्वामी विवेकानंद यांच्याजवळ बसून वेदान्तासंबंधीं चर्चा करावी या हेतूनें एक गृहस्थ आले. त्यावेळीं पंजाबमध्यें भयंकर दुष्काळ पडलेला होता. जनतेची उपासमार चालू होती. त्या भागांतून आल्यामुळें स्वामीजींनीं त्यांच्याजवळ दुष्काळ-पीडितांसाठीं कोणकोणती व्यवस्था करण्यांत आली आहे, सरकार व पुढारी त्याबाबतींत काय काय करीत आहेत याचीहि चौकशी केली आणि या चर्चेंत बहुतेक सारा वेळ खर्च झाला.

स्वामीजींचा निरोप घेऊन जातांना ते सद्गृहस्थ मला म्हणाले, 'मी आलों होतों आपल्याबरोबर वेदांतासंबंधीं चर्चा करण्याच्या हेतूनें; परंतु सारा वेळ खर्च झाला दुष्काळासंबंधीं चर्चा करण्यांत ! काय करणार !

यावर स्वामीजी गंभीरतापूर्वक म्हणाले, 'बाबारे ! जोपर्यंत माझ्या देशांतील दरेक व्यक्ति काय, परंतु कुत्रासुद्धां उपासमारीमुळें तडफडत असेल तोंपर्यंत, त्यांच्या पोटापाण्याची सोय लावणें हा माझा पहिला वेदान्त ! त्याचा अंत लागल्यानंतर इतर वेदान्ताच्या गोष्टी !

**— विवेकानंद चरित्र**

दुःखाच्या व आपत्तीच्या प्रसंगीं कणखर बना व सुखाच्या प्रसंगीं नम्र व्हा. सुखांत काय किंवा दुःखांत काय, समतोलपणा गमावूं नका. एखाद्याशीं, फाजील किंवा जरूरीपेक्षां अधिक सलगी ठेऊं नका किंवा कोणाशीं तुसडेपणानेंही वागूं नका. दोन्हीं दुर्गुण आहेत. ह्यां त्यांमधील सुवर्णमध्य साधण्याकडे नेहमी लक्ष ठेवा म्हणजे सुखी व्हाल.

**— महर्षि वाल्मिकी**

एक सज्जन गृहस्थ मोठा पुण्यशील होता. त्याचा हात नेहमीं उंच असे. कोणी अडचणींत सांपडलेला येईल त्याला शक्तिनुसार द्यायचा; परंतु ज्याला द्यायचा त्याच्याकडे वर मान करून तो पहात नसे. एका गृहस्थाच्यानें रहावेना. त्यानें विचारलें, "काय हो ! तुम्हीं दानधर्म करतां पुष्कळ; परंतु देतांना डोळे खालीं का ? घेणाऱ्याचा चेहरा न पाहिल्यामुळें तुम्हीं कोणाला ओळखीत नाहीं व कित्येक लोक दोन वेळांही घेऊन जातात !"

यावर तो परोपकारी सज्जन म्हणतो, "मी डोळे वर करुन कशाला पाहूं ? मी देणारा कोण ? आणि माझें आहे काय ? देणारा तो भगवान् ! तो पाहून घेईल. मी केवळ निमित्तमात्र. असें असतां लोक मला दाता म्हणतात व त्याची लाज वाटून मी खालीं पहातों !"

एक डुबकी मारून रत्न हातीं लागलें नाहीं म्हणून समुद्राला रत्नहीन मानूं नको. बुड्या मारतां मारतां रत्न हातीं लागलेच लागेल. थोड्याशा समाधानानें 'मला ईश्वर प्राप्ति होत नाहीं' असें मानून हताश होऊं नको. धैर्य व चिकाटीपूर्वक नामस्मरण चालू ठेव. योग्यवेळीं देव तुझ्यावर कृपा करील व व तुझी मनकामना पूर्ण करील.

**— श्रीरामकृष्ण**

# श्री साईबाबांची भक्ति

लेखक : आप्पाराव

**मात्र माझें करा स्मरण । विश्वासयुक्त अंतःकरण**
**ठेवा, करा निष्काम भजन । कृतकल्याण पावाल ॥**

—श्री साईसच्चरित

श्री साईबाबा समाधिस्थ होऊन सुमारें बेचाळीस वर्षांचा काळ मागें पडलेला आहे. आणि एवढ्या या दीर्घकाळा नंतरही त्यांचें पुण्यस्मरण, भक्ति, भजन जनतेला तारक, पोषक व कल्याणप्रद होऊन राहिलें आहे. आपल्या ह्यातींत आपले निस्सिम भक्त सुखी व्हावेत, त्यांची मनकामना पूर्ण व्हावी व त्यांच्याकडून सत्कार्यें घडावीं यासाठीं ते झटत असत. आज प्रत्यक्ष देहानें ते आमच्यांत वावरत नसले, तरीही त्यांचें ते कार्य अखंडित चालू आहे. जनमनावर त्यांचा जो पगडा बसलेला आहे तो उगाच नाहीं. बाबा हें जागतें दैवत आहे. जो जो त्यांची आठवण करील, जो जो त्यांची अंतःकरणापासून भक्ति करील, जो जो त्यांच्याठायीं निस्सीम श्रद्धा भाव ठेऊन वागेल, त्याचें कोटकल्याण झाल्याशिवाय रहाणार नाहीं. पाहिजे अखंड स्मरण, श्रद्धा व भक्ति.

**संकटप्रसंगीं बाबा—**

आजकाल आम्हीं देवाची किंवा बाबांची आठवण करतों ती संकटसमयीं. अंतःकरणांत भक्तीचा ओलावा जागा होऊन शिरडीला धांव घ्यावीशी वाटते ती अडीअडचणीच्यावेळीं. तरीही बाबा तुमच्या भक्तिभावाचें फळ तुमच्या पदरांत टाकल्याशिवाय रहात नाहींत.

आम्हीं सारेजण तात्पुरत्या सुखाकडे व फायद्याकडे पहाणारे आहोंत. आमच्या भजन पूजनांत व पाठांतरांत कांहीं ना कांहीं हेतु हा असतोच. निष्काम भजन पूजन करणारे फार थोडे. आणि ज्यांच्या वाट्यास निष्कामवृत्तीचें भाग्य आलें ते धन्य होत.

सकाम भक्ति करतां करतां तरी आम्हीं पायरी पायरीनें निष्काम भक्तिकडे वळलें पाहिजे. भक्तिभावांत सातत्य, अखंडितपणा संभाळला पाहिजे. हा अखंडितपणा सांभाळणें म्हणजे काय ! श्री साईबाबांची भक्ति करायची व ती सतत चालू ठेवायची म्हणजे काय ? आमच्या देहांत अनेक दुर्गुणांनीं कायमचें घर केलें आहे. आमचा स्वार्थ तेवढा आम्हांला दिसतो. तो दिसावा, परंतु त्याच बरोबर इतरेजनांच्या सुखाचा आम्हांला विसर न पडावा-आपल्याकडून दुसऱ्याच्या उपयोगीं पडण्यासाठीं जें जें करता येण्यासारखें असेल तें तें करण्याकडे आमचें लक्ष स्वयंस्फूर्तीनें वळलें पाहिजे. मी माझें कल्याण साधीन, परंतु त्याच बरोबर इतरेजनांच्या कल्याणासाठीं शक्य त्या परीनें झटेन, ही भावना मनांत सदैव जागृत राहिली पाहिजे.

## इतरांचेंही कल्याण दिसावें

आमची दृष्टि आज अत्यंत आकुंचित आहे, ती दूरवर फांकली पाहिजे. आमचें कल्याण तेवढें आम्हांला दिसतें, त्याचबरोबर इतरांचेंही दिसलें पाहिजे! बाबाकडे लक्ष लावायचें म्हणजे बाबांचें जसें दीन दुबळयांकडे व दुःखितांकडे नेहमीं लक्ष लागून राहिलेलें असे तोच कित्ता आम्हीं गिरविला पाहिजे. म्हणजे आमच्यांत माणुसकी आली पाहिजे. रोज दुसऱ्यांच्या उपयोगी पडण्याचे कितीतरी मोके येतात. मनांत आणिलें तर दुसऱ्यांसाठीं आम्हीं कांहीं ना कांहीं करूं शकतों; परंतु दुर्दैवानें तशी बुद्धीच होत नाहीं आपल्याला!

तोच बाबांचा आवडता भक्त होऊं शकेल व त्याच्यावरच बाबांची कृपादृष्टि वळूं शकेल कीं जो परदुःख शीतळ न मानतां तें दुःख दूर करण्यासाठीं झटेल व त्यासाठीं पुढें सरसावेल.

बाबा नवसास पावावे म्हणून आपण नवसखायास करतों; परंतु भलत्यासलत्याच्या नवसास बाबा कसे पावतील! जशी श्रद्धा तसें फळ. तूंच माझें सर्वस्व. तुझ्याशिवाय माझा त्राता दुसरा कोणी नाहीं, अशा तळमळीनें, अंतःकरणपूर्वक केलेली प्रार्थना त्यांना पोहोंचते.

## बाबांना आवड कशाची!

आम्हीं शिरडीची यात्रा करतों, केलेले नवस फेडतों; श्री साई सच्चरिताचीं पारायणें करतों; गोड गोड नैवेद्य दाखवितों. हे अशाप्रकारचे सारे बाह्योपचार आपण करतों; परंतु त्यांत आपलें अंतःकरण असतें का! बाबांना तुमचे डामडौल व दिखाऊपणा नको. बाबांना तुमचें अंतःकरण पाहिजे. बाबांना तुमचें सदाचरण पाहिजे. बाबांना तुमची सच्छीलता पाहिजे.

बाबांची सेवा म्हणजे मानवसेवा. बाबांची खरीखुरी भक्ति म्हणजे माणुसकीचें आचरण. आपल्या कृपेचा प्रसाद कोणाला मिळतो! कोणत्या गोष्टींवर आपण निश्चयत खुष आहोंत व कोणत्या गोष्टी केल्या असतां आपण प्रसन्न होतों हें बाबांनीं स्पष्ट शब्दांत सांगितलें आहे.

> **आल्यागेल्याचा आदर करीं। तृषितां जल भुकेल्या भाकरी।**
> **उघड्यास वस्त्र बसाया ओसरी। देतां श्रीहरी तुष्टेल ॥**

या माणसाच्या मामुली व सर्वसाधारण गरजा झाल्या. आज जगांत जें तांडव चालू आहे, ज्या चढाओढी, हालचाली व उपद्व्याप चालू आहेत, ते कशासाठीं? पोटभर अन्न मिळावें, अंगभर वस्त्र मिळावें व रहायला आसरा मिळावा, यासाठीं या जिवाच्या साऱ्या आटापिटी! सारें राजकारण या तीन गोष्टींत सामावलेलें आहे. यासाठीं युद्धें, तंटे, भांडणें, कापाकापी, वितंडवाद चालू आहेत.

## साऱ्या आटापिटी कशासाठीं!

सूक्ष्म दृष्टीनें पाहिलें असतां वादविवाद व झगडे होतात ते या तिन्हीं गोष्टींसाठीं

किंवा त्यांपैकीं एखाद्या गोष्टीसाठीं. आज जगांत सुखी कोण ! ज्याच्याजवळ भरपूर अन्नवस्त्र व जागा आहे. या जगांत बहुसंख्य लोकांपाशीं यांपैकीं एक आहे तर दुसरें नाहीं किंवा तिन्हींही नाहींत; आणि म्हणून तीं दुःखी कष्टी !

समाजांतील हा दुःखीकष्टीपणा जावा यासाठीं हस्तें, परहस्तें झटणें, जरूर त्या साधनाच्या अभावीं होणारे कष्ट आपल्या हातून होतील तेवढे कमी करणें व आपल्या शक्तीप्रमाणें जे जे आपल्या सान्निध्यांत येतील त्यांच्या सुखासाठीं व आनंदासाठीं झटणें, हीच बाबांची खरीखुरी पूजा व सेवा होय.

तुम्हीं बाबांच्या चरणीं काय काय वाहिलें यापेक्षां तुम्हीं दुःखितांचें दुःख कमी करण्यासाठीं त्यांच्या जीवनांत आनंदाचा ओलावा आणण्यासाठीं व त्यांचें दैन्य निवारण करण्यासाठीं किती झटलां, याकडे बाबांचें लक्ष बारकाईनें असतें. दुसऱ्यांचें दुःख दैन्य दूर करण्यासाठीं झटणें हा मानवधर्म आहे. परंतु नेमके त्याच धर्माला आम्हीं पोरखे झालेले आहोंत. श्री साईबाबा काय किंवा आजवर होऊन गेलेले थोर संत महात्मे काय, याच मानव धर्मावर अर्थात् माणुसकीवर सर्व जोर देत आलेले आहेत. आणि या मानवतेची, माणुसकीची पूजा–तिचें अहर्निश आचरण म्हणजेच श्री साईबाबांचें भजन–पूजन.

अशा रीतीनें जे श्रीसाईबाबांचें पूजन अर्चन करतील त्यांचें कोडकौतुक पुरवि-ल्याशिवाय व त्यांचें कोटकल्याण केल्याशिवाय, ते केव्हांही रहाणार नाहींत. तेंच तर त्याचें ब्रीद आहे व त्यासाठींच त्यांचा अवतार आहे.

**जो मजलागीं अनन्य शरण । विश्वासयुक्त करी मत्भजन ।**
**माझें चिंतन, माझें स्मरण । तयाचें उद्धरण ब्रीद माझें ॥**

---

एकदां स्वामी विवेकानंद यांनीं गांवोगांव फिरून धार्मिक विचारांचा फैलाव व जनतेंत जागृति घडवून आणण्याची आपले एक सहकारी विरजानंद यांस विनंती केली. त्यावेळीं मोक्षासाठीं ज्यांची धडपड चाललेली होती असें विरजानंद म्हणाले, ' मोक्षासाठीं मला अजून कांहीं साधना करावयाची आहे, ती मला पूर्ण तरी करूं द्या.'

हें उत्तर ऐकून स्वामी विवेकानंद गर्जून म्हणाले, ' मोक्ष अधिकाराशिवाय मिळवितां येत नाहीं. मोक्षासाठीं नर्कवासांत जावें लागेल. मोक्षपदाची तळमळ लागली असेल तर दुसऱ्यांची सेवा करा. सेवा करतां करतां संकटांचा वर्षाव झाला तरी त्यांचें स्वागत करा. स्वार्थबुद्धीनें वागून स्वर्ग किंवा मोक्ष मिळविण्यापेक्षां परमार्थासाठीं सहन केलेल्या संकटांनीं तुमच्यासाठीं मोक्षाचें द्वार खुलें होणार आहे.

— स्वामीजींचें चरित्र

प्रत्येक मनुष्याला कांहीं ना कांहीं महत्वाकांक्षा असते, असें म्हणतात. माझी मात्र एकच महत्वाकांक्षा आहे व ती म्हणजे मी सर्वांच्या आदरास पात्र व्हावें हीच.

— लिंकन

एक सत्यकथा —

# गायिकेनें डोळे उघडले !

**एका रजपूत महाराजांची स्वामिजीवरील श्रद्धा—श्रद्धा फळास आली—राज्यांत आनंदी आनंद—गायिकेच्या गायनास हजर रहाण्यास स्वामीजींचा नकार—नंतर उपरति कशी झाली ?**

अबूचा पहाड हें हवा खाण्याचें एक स्थान असल्याचें सर्वांना माहीत आहे. गुजरात काठेवाड व राजपुतान्यांतील अनेक राजे, महाराजे उन्हाळ्यांत अबूच्या आश्रयास जात असत. या देशांत संस्थानांचें अस्तित्व होतें, त्या जमान्यांतील ही गोष्ट आहे. खेत्री या संस्थानचे राजेसाहेब त्या वर्षी अबूच्या पहाडावरील आपल्या बंगल्यांत रहायला आले होते. पहाडावर फिरतां फिरतां एका गुंफेंत त्यांची व स्वामी सच्चिदानंद यांची भेट झाली. स्वामीजींची देहयष्टी विशाल, भव्य व आकर्षक. त्यांचा कोणावरहि प्रथम दर्शनींच प्रभाव पडत असे. ज्ञानसंपन्नहि तसेच. त्यामुळें त्यांच्या परिचयांत येणारा त्यांच्याकडे सहाजिकच आकर्षिला जात असे.

राजेसाहेबांचें व स्वामीजींचें थोडेसें संभाषण झालें. राजेसाहेबांची त्यांच्यावर श्रद्धा जडली. बंगल्यावर येण्याची त्यांना विनंती केली व तिला मान देऊन स्वामीजी बंगल्यावर गेले. राजेसाहेबांनीं त्यांना २।४ दिवस अत्याग्रहपूर्वक ठेऊन घेतलें. इतर अनेक राजेरजवाडे आसपासच्या बंगल्यांतून रहात असत. ते तेथें येत जात असत. ते मनांत म्हणूं लागले कीं, खेत्रीच्या राजेसाहेबांस काय हें वेड लागलें आहे ! स्वामींच्या नादीं लागले आहेत !

स्वामी स्वस्थानीं जाण्यासाठीं निरोप घेऊं लागले तेव्हां राजेसाहेबानीं मनांतील टोचणी बोलून दाखविली. त्यांना सर्व अनुकूलता होती. परंतु पुत्रसंतती नव्हती. गादीला वारस नव्हता. ते म्हणाले, ‘आपला आशीर्वाद असावा. आपण देवासन्निध गेलेले आहांत. आपण मनांत आणिलें तर माझी इच्छा परिपूर्ण होऊं शकते.’

यावर स्वामीजी हंसले, म्हणाले, ‘ही सारी प्रभूची लीला आहे; माझ्या कृपेचा कांहीं उपयोग नाहीं. त्याच्या कृपेस पात्र होण्यासाठीं जपा. तोच तुमची इच्छा पूर्ण करण्यास समर्थ आहे.’

राजेसाहेबांची स्वामीजीवर पूर्ण श्रद्धा होती. त्या श्रद्धेचें फळ त्यांना मिळालें. राणीनें पुत्रास जन्म दिला. राज्यभर आनंदीआनंद झाला. राजघराण्यांतील आनंदाला तर पारावार नव्हता. राजेसाहेबानीं सतत तीन दिवस पुत्रजन्मोत्सव साजरा केला. राजपुतान्यांतील अनेक संस्थानिक या उत्सवांत भाग घेण्यासाठीं आले होते. राजे, महाराजे, सरदार वगैरे बड्या पाहुण्यांनीं नगरी गजबजून गेली होती. यावे ते सर्व आले; परंतु ज्यांच्या कृपाप्रसादानें हा आनंदाचा व सोनियाचा दिवस उगवला, ते स्वामीजी नकोत का यायला !

त्यांची हजेरी नाहीं तर कसला उत्सव ! स्वामीजी म्हणजे एक लहरी फकीर; ते न आले तर ! कोण काय करणार त्यांचें ! त्यांना आणण्याच्या कामगिरीवर राजेसाहेबांनीं आपले एक मंत्री जगमोहन पाल यांची योजना केली. आणि त्यांनीं आपली कामगिरी उत्तम-प्रकारें पार पाडिली.

स्वामीजींचें आगमन झालें. स्वामीजीसाठीं राजवाड्यानजीकच एक सुंदर तंबू ठोकण्यांत आला होता.

उत्सव चालू होता. रोज रोज नवे व चित्ताकर्षक कार्यक्रम ठेवण्यांत आले होते. एके दिवशीं संध्याकाळीं एका नामांकित गायिकेच्या गायनाचा जलसा ठेवण्यांत आला होता. राजवाड्यांतील भव्य दिवाणखाना श्रोत्यांनीं चिकार भरून गेलेला होता. गायिके-कडे सर्वांचें लक्ष लागून राहिलेलें होतें. ती राजाज्ञेची वाट पहात होती. परंतु राजेसाहेबांचें लक्ष स्वामीजींच्या आगमनाकडे लागून राहिलें होतें. मंत्री महाशय त्यांना बोलावण्यासाठीं गेले होते; परंतु ते गेले तसे एकटेच परत आले.

राजेसाहेबांजवळ जाऊन मंत्रीमहाशय म्हणाले, ' स्वामीजीनीं नकार दिला. ते म्हणाले, माझ्या सारख्या सन्याशाला गायिकेच्या जलशांत येऊन काय करायचें आहे ! आपण सर्वांनीं गायनाचा खुशाल लाभ घ्यावा. '

गायिका जवळच होता. तिच्या कानीं ते शब्द पडले. तिला अतीशय दुःख झालें. ती गळल्यासारखी झाली; परंतु तिनें कंबर कसली. सूरदासाचें एक पद तिला त्याक्षणीं आठवलें. त्या प्रसंगाला तें अगदीं योग्य होतें. तें करुणापूर्ण व अंतः करणांत कालवाकालव करणारें होतें. आणि मधुर स्वरांत गायिका गाऊं लागली:—

प्रभू ! मोरे अवगुण चित न घरो,
समदर्शी है नाम तिहारो,
चाहे तो पार करो.
ईक लोहा पूजामें राखत,
ईक घर बधिक पयो,
पारस गुण अवगुण नहिं चितवत
कंचन करत खरो.

गायिकेचे ते मधुरालाप, ते आर्तस्वर स्वामीजींच्या कानीं जाऊन पडत होते. एकेक चरण आळविला जात होता आणि त्याबरोबर स्वामीजींची अस्वस्थता वाढत चालली होती.

गायिका म्हणजे एक हलक्या वर्गातील बाई ! तिचें गायन तें काय ऐकायचें ? त्या गोष्टीशीं आपलें कर्तव्य नाहीं, अशा भ्रामक समजुतीनें स्वामीजीनीं जलशास हजर रहा-ण्याच्या बाबतींत जाणून बुजून टाळाटाळ केलेली होती; परंतु आतां त्यांना आपल्याकडून घडलेल्या अनादराची व चुकीची जाणीव झाली. त्यांचें मनच त्यांना खाऊं लागलें ! ती

एक गाणारी बाई आणि मी एक संन्यासी हा भेदभाव किती भयानक आहे! मी हीन दृष्टीनें त्या बाईकडे पहावें हा माझ्या दोष होय. प्रत्येक प्राणिमात्रांत परमेश्वर आहे व त्याच भावनेनें प्रत्येकाकडे पहावयाचें; प्रत्येक प्राणिमात्रांत प्रभूचें दर्शन घडावें, इतक्या उच्चतर भावनेनें प्रत्येकाकडे पहावें हा खरा संन्यास धर्म होय. तो सोडून मी एका गायिकेला हलकी मानून तिचा अपमान केला, तिची मी उपेक्षा केली– अशा प्रकारची टोचणी स्वामीजींच्या मनाला लागून ते एकदम बेचैन झाले.

गायिका गात होती. मधूर, आर्तस्वर तिच्या मुखांतून बाहेर पडत होते–

**प्रभू ! मोरे अवगुण चित न धरो !**

यापूर्वी सूरदासांच्या अनेक पदांचें व त्याही पदांचें पाठांतर स्वामीजींनीं केलें होतें; परंतु आज ' प्रभू मोरे अवगुण चित न धरो ' या चरणाचा त्यांच्या अंतःकरणावर जो ठसा उमटला तसा पूर्वी केव्हांही उमटला नव्हता. आज तो चरण त्यांच्या हृदयाला जाऊन भिडला. आज त्या चरणानें त्यांना नवी दृष्टि दिली !

आणि मग काय झालें? स्वामीजी आपण होऊन तंबूबाहेर पडले व त्या मेळाव्यांत मुकाट्यानें जाऊन बसले! सर्वांना मोठें आश्चर्य वाटलें. गायिकेला आज आपण कृतार्थ झाल्याचें समाधान वाटलें. त्यानंतर तिनें गायिलेल्या प्रत्येक पदाला टाळ्यांवर टाळ्या पडूं लागल्या. ती गायनांत पूर्णपणें रंगली व स्वामीसह सर्वांना तिनें रंगविलें व डोलविलें! कृतार्थतेचें तें गोड फळ होतें.

स्वामीजी त्यानंतर धर्म प्रचारासाठीं थोड्याच दिवसांनीं अमेरिकेस जावयाचे होते. थोडे दिवस राजेसाहेबांचा पाहुणचार स्वीकारून ते जयपूरला गेले. तेथून जयपूर नव्वद मैलांवर आहे. खेत्रीचे महाराज स्वामीजीना प्रेमाचा निरोप देण्यासाठीं जयपूरपर्यंत सांगाती गेले.

आणखी एक सांगण्यासारखी घटना आहे. स्वामीजी हा वेळपर्यंत सच्चिदानंद किंवा इतर नांवानीं परिचित होते. त्या गायिकेनें त्यांचे डोळे सताड उघडले होते. त्यांना खोलांत शिरून विचार, विवेक करायला तिनें लाविले होतें. त्या वेळेपासून त्यांना वाटूं लागलें कीं, प्रत्येक लहान सहान बाबतींतहि आपण विवेकानें वागलें पाहिजे; विवेक केला पाहिजे. जो विवेकानें वागेल तोच खरा संन्यासी! आणि त्या घडीपासून त्यांनीं **विवेकानंद** हें नांव धारण केलें.

आणि त्याच नांवानें तद्नंतर अमेरिकेंत, भारतांत व अखिल जगतांत ते सुविख्यात झाले !

—'**समर्पण**' (गुजराथी) वरून साभार.

# जप, तप, साधन

********************

## आवडत्या नांवाचा जप

ज्या नामाच्याठायीं आपली भक्ति जडली असेल तोच नामजप नक्की करून त्याचा नित्यनेमानें व फावल्यावेळीं जप करावा. उदाहरणार्थ, श्रीसाईबाबा हें आपलें इष्ट दैवत मनाशीं भक्तिभावपूर्वक निश्चित केल्यानंतर 'साईनाथ गुरु माझे आई। मजला ठाव द्यावा पायीं' हा किंवा यासारखा चरण आपल्या जिव्हाग्रीं सदासर्वकाळ खेळत राहिला पाहिजे. या चरणाचा जप, त्याचें ध्यान, त्याचें पूजन हें सर्व कांहीं चालू असतां मग श्रीकृष्ण, महादेव, श्रीराम, हनुमान वगैरे देवदेवतांचीं नांवें तुम्हीं प्रसंगोपात घेतली म्हणून त्यांत कांहीं बिघडत नाहीं. ज्या परमात्म्याचा वास श्रीसाईबाबांत आहे तोच इतर देवदेवतांस व्यापून राहिला आहे. अशा रीतीनें निष्काम वृत्तीनें परंतु श्रद्धापूर्वक साधक जसजसा जप, ध्यान, पूजन, वगैरे करूं लागेल, त्या प्रमाणांत त्यांच्याठायीं असलेले राग, द्वेष, मत्सर, वगैरे दुर्गुण आस्ते आस्ते कमी होऊं लागतील. जपाचें व ध्यान धारणेचें फार महत्त्व आहे. ( या अंकांत तत्संबंधीं स्वामी शिवानंद यांचे मार्गदर्शक विचार मुद्दाम देण्यांत आले आहेत; त्याकडे वाचकांनीं लक्ष पुरवावें. )

साधकानें नामजपाचा केव्हांही कंटाळा करूं नये. त्याला निर्धार व निष्ठापूर्वक सदैव चिकटून रहावें. त्यांतच कल्याण आहे, याची मनाशीं पक्की खूणगांठ बांधून ठेवावी. भक्तिभावाचें व श्रद्धेचें मधुर फळ हें पदरांत पडावयाचेंच. वाट चालून गेल्याशिवाय इच्छित गांवाला पोहोंचतां येत नाहीं, त्याचप्रमाणें भजल्याशिवाय भगवंताची प्राप्ति होत नाहीं.

× × ×

## भक्तियोगाचें गोड फळ

आपलें चित्त भगवंताच्यासाठीं लावावयाचें व भगवंताशीं एकरूप व्हावयाचें यालाच योग म्हणतात. आपल्या समोंवार आपण जें जें पहातों तें तें सर्व भगवंतानें निर्मिलेलें आहे. परमात्मा सर्वत्र व्यापून राहिलेला आहे. तो सर्वशक्तिमान् सर्वज्ञ, अविनाशी व अनादि आहे. मी त्याचें मनापासून भजनपूजन केलें तर तो मला पावेल, तोच माझें सर्वस्व व तोच मला तारणारा आहे, या भावनेनें भक्तिभावपूर्वक भगवंताची आराधना करणें व त्याच्याशीं एकरूप होणें याचेंच नांव योग. चित्ताला ज्याचा अहोरात्र छंद लागेल, त्याची त्याला प्राप्ति होईलच. एकदां भगवंताच्याठायीं चित्तवृत्ति लीन झाल्यानंतर साधकाला आणखी साधावयाचें असें कांहीं रहात नाहीं. कारण भगवान् म्हणजे कल्पतरू. त्याचा ज्यानें आश्रय घेतला व तो मिळविला, त्याला कशाचीही ददात भासणार नाहीं.

अनेक अडचणींतून व संकटांतून मार्ग चोखाळावा लागतो हें तर खरेंच. परंतु श्रद्धावान् साधक शेवटीं भक्तिभावाच्या बळावर भगवंताला प्राप्त करून घेतोच. भक्तियोगाचें हें गोड फळ आहे. भाव, श्रद्धा या दोन गोष्टींचें मात्र भरपूर पाठबळ असलें पाहिजे.

× × ×

**तपाचें सामर्थ्य—**

ज्यानें आपलें चित्त स्वतःच्या ठायीं वास करणाऱ्या आत्मारामावर एकाग्र केलें त्यानें कोणताहि संकल्प केला तरी तो सफळ झालाच पाहिजे. संकल्पाला तपाचें पाठबळ जरूर असतें. तपाशिवाय पोकळ संकल्प काय कामाचा? तप म्हणजे तरी काय? तप म्हणजे इंद्रिय निग्रह. चित्ताचा व इंद्रियांचा निग्रह करून, त्यांना जगापासून खेंचून त्यांना परमात्म्याकडे वळविणें म्हणजे तप. अशा रितीनें परमात्म्याच्या ठायीं चित्त लीन झालें म्हणजे संकल्प फळास आला असें समजावयाचें. परंतु अंतःकरणांत भोगेच्छा फार प्रबळ असते. ती चित्ताला भगवंताकडे वळवूं इच्छित नाहीं. यासाठीं चित्तावर सक्त पहारा ठेवण्यांत आला पाहिजे. संस्कार पुसून टाकणें कठीण असतें. चित्ताला नेहमीं खेचून भगवन्नामाकडे वळविण्यांत आलें पाहिजे.

× × ×

**उद्यां नाहीं आजच कर**

माझ्या वयाला होऊं द्या पुष्कळ वर्षें. म्हातारपण आलें म्हणजे देवधर्म पहातां येईल, असें म्हणून मनाचें खोटें समाधान करून घेऊं नकोस. जें कांहीं करायचें असेल आजपासूनच कर. उद्यांची गोष्ट नको. जसजसें वय होत जातें, तसतसें शरीर घटत जातें, इंद्रियांची शक्ति मंदावत जाते, मन दुबळें बनतें. पचन शक्ति कमी होते. कानांनीं कमी ऐकूं येऊं लागतें, डोळ्यांनीं मंदमंद दिसूं लागतें. शरीर नाना रोगांचें घर होऊं लागतें. तेव्हां भगवंताचें नांव घ्यायचें, भगवंताचें कार्य करायचें तें एव्हांपासूनच सुरू कर. तुला जो कांहीं परोपकार करायचा असेल, सत्संग करायचा असेल, सेवा करायची असेल व कोणतेंही पुण्य किंवा सत्कार्य करायचें असेल, त्याची सुरुवात आजपासून, या घडीपासून कर; मग मनांत असूनहि तुला कांहीं करतां येणार नाहीं. तूं कांहीं करूं शकणार नाहींस. पुढें असा एक काळ आयुष्यांत येईल कीं, तुझ्याजवळ कांहीं रहाणार नाहीं, तुझ्याजवळपास कोणी येणार नाहीं, जो तो तुझा तिरस्कार करील; परंतु चालत्या काळांत तूं जीं सत्कृत्यें केलेलीं असतील, भगवंताची जी भक्ति केलेली असेल व जी कांहीं परोपकाराचीं कृत्यें केलेलीं असशील, तींच पुढें तुझ्या पडत्या काळांत उपयोगी पडतील. तेव्हां आजच देवाचें नाव निरंतर घेण्याचा परिपाठ सुरू कर, संधि मिळेल तसतसा परोपकार करीत जा, कधींही कोणाच्या हितसंबंधाआड येऊं नकोस व नातलग, संबंधीजन, संसार व संसारांतील सुखोपभोग यांच्या ममतेनें भारावून न जातां हळुहळू ते पार तोडण्याच्या मार्गाला लाग.

---

# शीलं परं भूषणम्

— चक्रवर्ति राजगोपालाचारी

**यक्ष** :—काय गमावून बसलों असतां दुःखाऐवजीं आनंद वाटतो ?

**युधिष्ठीर**—क्रोध. याला गमावून बसल्यानें आपणास केव्हांही दुःख खेद होणार नाहीं.

**यक्ष**—या जगांत अशी कोणती गोष्ट आहे कीं, जिचा त्याग केल्यानें मनुष्य श्रीमंत बनूं शकेल ?

**युधिष्ठीर** : कामना. हिच्यापासून जो स्वतःची सुटका करून घेईल त्याला श्री व सुसंपन्नता माळ घातल्याशिवाय रहाणार नाहीं.

**यक्ष** :—मनुष्य ब्राह्मण कशाच्या बळावर बनूं शकतो ? जन्माच्या, चारित्र्याच्या कीं विद्वत्तेच्या ?

**युधिष्ठीर** :—जन्मामुळें किंवा विद्वत्तेच्या बळावर मनुष्य ब्राह्मण बनूं शकत नाहीं, केवळ चारित्र्याच्या बळावर तो ब्राह्मण बनूं शकतो, मनुष्य वाटेल तेवढा विद्वान् असला परंतु तो जर वासनांचा गुलाम झाला तर त्याचें ब्राह्मणत्व कुठें राहिलें ! त्यानें चारी वेदांचें पारायण केलेलें असलें व तें त्याला मुखोद्गत असलें तरीही त्याचें चारित्र्य मलिन झालेलें असल्यास तो हलक्या कोटीचा गणला जाईल. यासाठीं 'शीलं परं भूषणम्' हें त्रिकालाबाधित सत्य आहे.

**यक्ष** :—मरणानंतर माणसाबरोबर सहकार कोण बरं करतो.

**युधिष्ठीर** :—धर्म. मरणानंतर आत्मा वेगळा होतो, एकाकी होतो. मग त्याचा एकट्याचाच प्रवास सुरू होतो. त्यावेळीं त्याला साथ देणारा त्याचा साथीदार धर्मच होय.

**यक्ष** :—सर्वांत मोठें पात्र कोणतें ?

**युधिष्ठीर** :—सर्वांना आपल्या पोटांत सामावून घेणारी पृथ्वी.

**यक्ष** :—सुख कशाला म्हणावयाचें ?

**युधिष्ठीर** :—आपल्या सद्वर्तनाचें आपणास जें फळ मिळतें त्याला सुख म्हणावयाचें.

**यक्ष** :—कशाचा त्याग केला असतां मनुष्य सर्वांच्या प्रेमाला पात्र होऊं शकतो ?

**युधिष्ठीर** :—अभिमानाचा. अभिमानाचा, अहंकाराचा त्याग केल्यानें मनुष्य सर्वांना आवडूं लागतो.

# प्रार्थनेचें अपरंपार सामर्थ्य

## ( एका अमेरिकन तत्त्वज्ञाचे विचार )

प्रार्थनेंत भयंकर सामर्थ्य आहे---प्रार्थनेनें सर्वस्वीं अशक्य गोष्टी शक्य करून दाखविल्या आहेत---प्रार्थनेंत प्राण ओतावा लागतो---दुसऱ्याच्या भल्यासाठीं प्रार्थना करण्याचें महत्त्व---त्यामुळें आपली अंतःकरण शुद्धि. दुसऱ्याच्या भल्यासाठीं प्रार्थना केल्यानें आपल्याच कल्याणाचा मार्ग मोकळा होतो.

प्रार्थनेचें सामर्थ्य अपरंपार आहे. अशक्य कोटींतील घटना प्रार्थनेमुळें घडून आल्या आहेत, प्रार्थनेवर श्रद्धा ठेवणारी असंख्य माणसें आजवर होऊन गेलीं. त्यांनीं मनोभावें केलेली प्रार्थना फळास आली आहे. ईशकृपेच्या व जपतपाच्या बळावर मानवजातीवर आपला पगडा बसविणारीं आजवर कितीतरी माणसें होऊन गेलीं. त्यांनीं प्रार्थनेच्या बळावर अघटित घटना घडवून आणिल्या आहेत व जनतेला आश्चर्य-चकित करून सोडलें आहे. त्यावरून अनन्यभावें केलेल्या प्रार्थनेचें सामर्थ्य किती आहे याची सहज कल्पना होऊं शकते.

असें असतां आपला अंतिम हेतु साध्य करून घेण्यासाठीं या अमोघ साधनाचा आपण कां बरें उपयोग करून घेत नाहीं?

होय, आपण प्रार्थनेकडे वळतों; परंतु केव्हां? जेव्हां आपल्यावर एखादें संकट कोसळलें असेल, किंवा एखाद्या आजारानें पछाडलें असेल अथवा देशावर एखादें महान् संकट कोसळलें असेल अशा वेळीं. इतर सर्व साधनांचा उपयोग मागें पडला म्हणजे आपण देवधर्माकडे वळतों व देवाची करुणा भाकूं लागतों. आमचा तो स्वार्थी हेतू असतो. केवळ स्वार्थासाठीं केलेली प्रार्थना फळास येतेच असें नाहीं.

मुलाबाळांना लहानपणापासून देवाची प्रार्थना करण्याची सवय जडलेली असते. तो एक स्वभावगुणच बनतो. मोठेपणींहि ती सवय कायम रहाते. देवाचें नांव घ्यायचें म्हणून घ्यायचें. त्यांत कांहीं अर्थ किंवा राम असतो असें नाहीं. आपण काय म्हणतों त्याचा अर्थहि आपणास माहीत नसतो. त्याचा विचार आपण करीत नाहीं; मग त्या शब्दावर आपली श्रद्धा कशी असणार? आणि ज्या शब्दावर आपली श्रद्धा नाहीं, जे शब्द अंतःकरण ढवळून बेंबीच्या देठापासून निघाले नाहींत, त्या शब्दांत प्राण कोठून येणार?

नाहीं का तूं पूर्ण करणार? माझी इच्छा तुझ्याशिवाय दुसरा कोण बरं पूर्ण करणार? तुला नाहीं का दया येत माझी?"

म्हणतां म्हणतां व्याकुळ व बेभान स्थितींत सूरदास धाडकन् जमिनीवर कोसळला!

## आतां डोळे बंद कर!

काय ती तल्लिनता व एकरूपता! अशा स्थितीला पोहोंचलेल्यास परमेश्वर नाहीं भेटला तरच नवल! सूरदासाचें आळवणें भगवंताच्या कानापर्यंत जाऊन पोहोंचलें. सूरदासाला दृष्टि नव्हती ती आली व भगवंताचें तें गोजिरें व नयनमनोहर स्वरूप त्यानें डोळे भरून पाहून घेतलें. ती मूर्ति त्यानें डोळ्यांत सांठवून ठेविली. त्याचें पूर्ण समाधान झालें. जें हवें होतें, जें आजवर जवळ आलें नाहीं तें जवळ आलें व मिळालेंही. आतां आणखी काय पाहिजे. जन्माचें सार्थक झालें. त्या अवस्थेंत सूरदास भगवंताला हात जोडून म्हणाला, " "हे भगवंता, तूं कृपाळू होऊन माझी इच्छा पूर्ण केलीस. माझ्या डोळ्यांस तुझें पुण्यपावन दर्शन घडलें. आतां माझी कोणतीही इच्छा पूर्ण व्हायची राहिली नाहीं. या डोळ्यांना इतर गोष्टी, रंगढंग कांहींएक पहाण्याची इच्छा नाहीं. सतत तुझें रूप डोळ्यांपुढें रहावें, त्यांनीं दुसरें कांहीं पाहूं नये ही माझी इच्छा आहे. डोळ्यांचें कार्य पार पडलें. आतां मला डोळे (दृष्टि) नकोत. तूं कृपाळू होऊन मला दृष्टि दिलीस तशीच ती परत घे. सतत तुझीच मूर्ति माझ्या दृष्टीपुढें राहूं दे."

भगवंतानें सूरदासाची तीहि इच्छा पूर्ण केली. आयुष्याच्या अखेरीपर्यंत सूरदास आंधळा राहिला; परंतु आपल्या भक्तिरसपर काव्यानें त्यानें असंख्य लोकांस नव्या व दिव्य दृष्टीचा लाभ करून दिला!

## जगमित्र नागा

परळी वैजनाथ या गावीं फार पूर्वी जगमित्र नागा या नांवाचा एक भगवद्भक्त होऊन गेला. तो संसारी ब्राह्मण होता; परंतु त्याचा संसार भिक्षेवर चाललेला होता. तो उत्तम कीर्तनकार होता. सर्वांचें लक्ष हरिभजनाकडे लागावें; यासाठीं तो परोपरीनें झटत असे. संतांचें तर हेंच कार्य असतें. 'आपुल्यासारिखे करिती तात्काळ!' परंतु या जगांत निरनिराळ्या विचारांचीं माणसें आपण पहातों. सात्विक, राजस व तामस. जितक्या व्यक्ति तितक्या प्रकृति! नागाचे चहाते होते, तसेच त्याचे वैरीहि होते. कित्येकांस त्याचा चाललेला बोलबाला सहन होत नसे. त्यांना वाटे कीं, हाच कोण एवढा! आम्हीं आहोंत कीं नाहीं, आम्हांला सोडून लोकांनीं त्याचा कां म्हणून उदो उदो करावा!

त्याच्याठायीं असलेल्या गुणांमुळें लोकांनीं त्याला उचलून धरावें हा का त्याचा अपराध? त्याच्याठायीं चांगुलपणा व माणुसकी होती हा का त्याचा दोष?

त्या गांवांत वर सांगितल्याप्रमाणें कांहीं दुर्जन होते. त्यांनीं जगमित्र नागाचा नायनाट करून टाकण्याचा डाव रचिला. त्याचा लौकिक त्यांना असह्य झालेला होता.

## घराला आग लाविली!

मग त्यांनीं काय बेत करावा! त्यांनीं ठरविलें कीं, नागाच्या झोपडीला रात्रींच्या प्रहरीं आग लावून द्यावयाची व त्याचा सत्यानाश करून टाकावयाचा! किती दुष्ट भावना ही!

हा दुष्ट विचार त्यांच्या मनांत येऊन तो तेथेंच थांबला नाहीं. त्यांची अंमलबजावणी आपल्या परीनें त्यानीं इमानें इतबारें केली.

शिव्या घालून पाहिल्या. पदोपदीं अपमान करून पाहिला, तरीहि वठणीवर येत नाहीं म्हणजे काय? शेवटीं एके दिवशीं रात्रीच्या प्रहरीं त्या दुष्ट लोकांनीं नागाच्या झोंपडीला आग लावून दिली!

अपरात्रीची वेळ. जगमित्र नागा हे त्यावेळीं भजनानंदांत गुंग झालेले होते. कांहीं तरी पेटत असल्याचें समजून ते उठून पाहूं लागले तों काय, चारी बाजूनीं अग्नीनें पेट घेतला होता. बाहेर पडण्यास वाव नव्हता. घरांत मुलेंबाळें स्वस्थ झोपीं गेलेलीं होतीं. आपल्यासह साऱ्या कुटुंबीजनांचें जळून भस्म होणार हें जगमित्रानें ताडलें. तो देवाच्या भक्तिसाठीं आसवलेला; यापुढें तो आनंद लुटतां येणार नाहीं व निरपराधी पोरेंबाळें जळून खाक होणार म्हणून तो दुःखी कष्टी झाला. त्यानें देवाला आळवायला आरंभ केला. विठ्ठलाशिवाय आपला रक्षणकर्ता व संकटहर्ता दुसरा कोणी नाहीं हें तो जाणून होता. ज्यानें आपणास सर्वस्व अर्पण केलें व ज्याची आपल्यावर संपूर्ण श्रद्धा त्या भक्ताच्या हांकेला ओ देणारा विठ्ठलच. विठ्ठल त्याच्या हांकेला धांवून आला. त्या घराचा वरचा मजला जळून खाक झाला. परंतु जगमित्र व त्याचें कुटुंब रहात होतें, त्या खालच्या मजल्याला जरासुद्धां धक्का लागला नाहीं.

**दुष्टांचा डाव साधला नाहीं**

जगमित्राच्या घराची राखरांगोळी झालेली पहाण्याच्या हेतूनें दुसऱ्या दिवशीं सकाळींच तें दुष्टांचें टोळकें बाहेर पडलें. आणि जवळ जाऊन पहातात तों काय! वरचा मजला जळून भस्म झालेला; परंतु खालचा मजला जशाचा तसा; आणि नेहमींप्रमाणें जगमित्र हातीं एकतारी घेऊन पांडुरंगाच्या भजनांत दंग झालेला! केवढा मोठा आश्चर्याचा धक्का बसला आहे त्यांना! सर्वांना मनस्वी आश्चर्य वाटलें. जगमित्र हा साऱ्या जगाचा मित्र आहे एवढेंच नव्हे, तर पांडुरंगाचाही मित्र आहे व पांडुरंगाची त्याच्यावर संपूर्ण कृपा आहे, याबद्दल सर्वांची खात्री पटली. दुष्टांना पश्चात्ताप झाला.

**काय हा त्याग!**

गांवांतील कांहीं सज्जन लोकांनीं जगमित्राच्या कुटुंबाची सोय व्हावी या हेतूनें त्याला कांहीं जमीन बक्षिस करून देण्याचा घाट घातला. परंतु त्याला कुठें कशाची जरूरी भासत होती. पोटासाठीं पाहिजे म्हणून चार घरें भिक्षा मागायची! आणि हेंच धोरण पुढेंही चालू रहायचें असें म्हणून जगमित्रानें जमीन स्वीकारण्याचें साफ नाकारलें. परंतु लोकांचा अतिशय आग्रह. त्यांनीं जमीन त्याच्या नांवें केली. गांवांतील चार शेतकरी जमून तिची मशागत करूं लागले व उत्पन्न काढून जगमित्राला देऊं लागले. त्यानें सांगितलें, ज्यांना कोणाचाहि आधार नाहीं अशा लोकांना तें उत्पन्न वाटून टाका. त्याच्या इच्छेप्रमाणें त्या उत्पन्नाचा गोरगरिबांस धर्म करण्यांत येऊं लागला, असा होता जगमित्र नागा.

( हातीं धनुष्यबाण घेतलेली आपली नेहमींची मूर्ति दिसल्याशिवाय माझें मस्तक नत होणार नाहीं ! )

आणि काय आश्चर्य ! त्या कृष्णमूर्तीच्या ठिकाणीं तुळसीदासजींना कोदंडधारी राममूर्ति दिसूं लागली ! त्यांनीं तिला भक्तिभावानें वंदन केलें. वर्ण्य–विषयाशीं इतकें तादात्म्य व्हावें, तेव्हां कोठें '**रामचरित मानसा**'सारखी अमर कलाकृति निर्माण होते.

## विठ्ठल रामरूप झाले

एकदां श्रीसमर्थ रामदासस्वामी कृष्णातटाकीं असतां त्यांच्या पुढून यात्रेकरूंचे थव्यांचे थवे चालले होते.' कुणीकडे चाललांत ' समर्थांनीं त्यांना विचारलें. 'आषाढी एकादशीसाठीं' पंढरीस जात आहोंत, चला आपणही आमच्या बरोबर, आम्हांस आनंद होईल, आपली संगति लाभेल. ' असें यात्रेकरू म्हणाले. ' आम्ही येऊन काय करणार ! शरयुतीर-निवासी श्रीरामावांचून आम्हांस दुसरें कोणी दिसतच नाहीं. ' तें उत्तर ऐकून यात्रेकरू आपल्या मार्गानें गेले.

श्रीसमर्थांची ही निष्ठा श्रीपंढरीनाथाला ठाऊक होती. तथापि, समर्थांना एकवार पंढरीस आणलेंच पाहिजे, असा विचार करून विठोबा वेष पालटून ब्राह्मणाचें रूप धारण करून श्रीसमर्थांना बोलाविण्यास आले. समर्थांचें पानगे भाजण्याचें काम चाललें होतें. तेवढ्यांत हा ब्राह्मण पातला. समर्थांस आनंद झाला. ते ब्राह्मणास म्हणाले,' स्नान करा, रामाचा प्रसाद तयार आहे. ' ब्राह्मणानें स्नान केलें, संध्या केली, सूर्यास नमस्कार केला आणि श्रीसमर्थांच्या समवेत पानगे भक्षण केले. ' आपण कोठें असतां, आपलें नांव काय ? ' म्हणून समर्थांनीं ब्राह्मणास विचारलें.' पंढरीस सहकुटुंब असतों, मला विठ्ठलभट म्हणतात. एकादशी जवळ आली, यजमान धुंडीत इकडे आलों. देवाचे भक्त तेच माझे यजमान. आपणही भक्तच आहांत, चलावें मजबरोबर पंढरीस. मी सांभाळून नेईन आपणाला. असें विठ्ठलभट नांव धारण केलेले प्रत्यक्ष पंढरीनाथ बोलले. " शरयु-तीरविहारी रामावांचून मला अन्य कोणाची अपेक्षा नाहीं. " असें समर्थांचें उत्तर ऐकतांच विठ्ठलभट म्हणाले, " तेथें प्रत्यक्ष हनुमंत आहेत व राम आणि रामाचे दास हनुमंत कांहीं भिन्न नव्हत. तेव्हां आपण हनुमंताच्या दर्शनास आलें पाहिजे. " समर्थांचें मन वळलें आणि विठ्ठलभटाच्या संगतीनें ते पंढरीस जाण्यास सिद्ध झाले. बरोबर दत्तु नापिक होताच. मार्गांत पाऊस लागला. चिखलांतून जावें लागलें. पायांत कांटे मोडले, विठ्ठलभटानें ते स्वतः काढावे. त्रिवर्ग पंढरीस महाद्वाराशीं येऊन पोचले. विठ्ठलभट " घरीं जाऊन येतों." म्हणाले, आणि निसटले. जागच्याजागीं गुप्त झाले. दत्तु नापिक विचारतो, ' विठ्ठलभट नाहींसे कसे झाले ? ' ' अरे, विठ्ठलभट कोठचे, ते स्वतः पंढरीनाथ होते, आम्हांवर त्यांचें हें केवढें ऋण ! ' श्रीसमर्थ म्हणाले.

समर्थांनीं हनुमंताचें दर्शन घेतलें आणि रामच समजून श्रीविठ्ठलाकडे पाहून विचारतात,

' येथें उभा कां श्रीरामा । मनमोहन मेघश्यामा ॥
चाप बाण काय केले । कर कटावरी ठेविले ॥
कां बा धरिला अबोला । दिसे वेष पालटला ॥
काय जाली अयोध्यापुरी । येथें वसविली पंढरी ॥
काय केली शरयुगंगा । येथें आणिली चंद्रभागा ॥
काय केलें वानर दळ । येथें वसविले गोपाळ ॥
दिसे हनुमंत येकला । । ह्या कां सैन्यांतून फुटला ॥
काय केली सीताबाई । येथें राही रखुमाई ॥
रामदासीं जैसा भाव । तैसा जाला पंढरीराव.'

विठ्ठलानें रामरूप धारण केलें. जगाला आश्चर्य वाटलें. सर्वांनीं समर्थांना विनंति केली, स्थान महात्म्य टिकलें पाहिजे. तेव्हां समर्थांनीं पुनरपि प्रार्थना केली आणि राम पुन्हां विठ्ठल झाले. श्रीसमर्थांना तेंही रुप मानवलें.

माझें मानस विटेवरी । विठ्ठलचरणीं निरंतरी ॥ १ ॥
जो जो पंढरीस गेला । तेणें कळीकाळ जिंकिला ॥ २ ॥
रामदास म्हणे पंढरी । नाना साधनविणें तारी ॥ ३ ॥

या गोष्टीचें तात्पर्य इतकेंच कीं,

जैसा भाव प्रतिबिंबला । तयाचा चि देव जाला ।
जो जैसें भजे त्याला । तैसा चि बोले ॥

## द्वारकेंत हनुमंतास रामदर्शन

अशाच प्रकारचा एक प्रसंग श्रीधरकवींनीं ' हरिविजय ' ग्रंथांत वर्णिला आहे.

श्रीरामचंद्र प्रभूंनीं अवतारकार्य संपवून आपला देह शरयुनदींत विसर्जन करतांच भक्त हनुमंत श्रीरामस्मरण करीत दक्षिणसागरीं राहूं लागले. एके दिवशीं नारदमुनी हनुमंतास भेटण्यास गेले. नारदास पाहून त्या रामभक्तास फार आनंद झाला. त्यानें प्रेमानें त्यांचें स्वागत केलें व त्यांना बसण्यासाठीं तृणासन दिलें. नारदानीं विचारलें,' बा हनुमंता, कसा वेळ घालवितोस ? '

हनुमंत म्हणाला; ' प्रभुचिंतन करीत असतों. '

नारद म्हणाले, ' असें करण्यापेक्षां तीर्थयात्रा कर म्हणजे संतांच्या भेटी होतील. आतां श्रीकृष्णावतार चालू आहे. द्वारकेंत जाऊन भगवंताचें दर्शन घे.

भोळ्या मारुतीस ही सूचना पसंत पडली. त्याप्रमाणें तो तीर्थाटनास निघाला. असें करतां करतां एके दिवशीं तो द्वारका नगरी बाहेरील फळबागेंत येऊन थडकला. स्वच्छंदानें विहार करून फळें तोडून खाऊं लागला. बाग रक्षकांनीं त्याला अडविलें. त्यांना त्यानें सळो कीं पळो करून सोडिलें. रक्षक भगवान् श्रीकृष्णाकडे येऊन तक्रार करूं लागले कीं, एक मोठा हुप्या येऊन त्यानें फळबागेची नासधूस चालविली आहे. आणि तो आम्हांला आटोपत नाहीं. भगवंतांनीं अंतर्ज्ञानानें जाणिलें कीं भक्त

मारुती त्यांच्या दर्शनाकरितां आला आहे. भगवंतालासुद्धां यादवांचा गर्वहरण करावयाचा होता.

श्रीकृष्णानें यादव सेनानींना त्याचा बंदोबस्त करण्यास पाठविलें. सेनापतीनें बागेंत जाऊन तो हुप्या पाहिला. त्याचें रूप पाहून ते मनांत घाबरले; परंतु धैर्य आणून ते त्याला विचारतात 'अरे मर्कटा ! ही बलरामांची बाग आहे. परवानगीशिवाय येथें येऊन फळें तोडणारा तूं रे कोण ?'

हनुमंत उत्तर करतो 'हा बलराम कोण ? मी प्रभू श्रीरामाशिवाय कोणालाच ओळखीत नाहीं.'

हें ऐकून यादवांना राग आला आणि ते त्याच्यावर चालून गेले. भक्त हनुमंतानें जागेवर बसूनच आपल्या पुच्छानें त्या सर्वांना असें ताडन केलें कीं ते सर्व सैनिक भीतीनें गर्भगळित होऊन व गर्वरहित होऊन श्रीकृष्णाकडे धांवत गेले.

"तो माकड मोठा भयंकर आहे. आमचें त्याच्या पुढें कांहीं चालूं शकणार नाहीं."

हें ऐकतांच कृष्णाला हसूं आलें व तो म्हणाला, "जा, त्याला सांगा, श्रीकृष्ण तुला भेटीस बोलावीत आहे."

सैनिक परत गेले व लांबूनच त्यांनीं हनुमंतास भगवंताचा निरोप कळविला.

मारुती म्हणाला, "मी रामाशिवाय कोणालाच ओळखत नाहीं !"

यादव परत श्रीकृष्णाकडे गेले व हनुमंताचें बोलणें त्यास सांगितलें. भगवंतानें त्यांना पुन्हां त्याचेकडे पाठविलें व श्रीराम भेटीस बोलावीत आहेत असा निरोप त्याला कळविण्यास सांगितले. श्रीरामचंद्र प्रभूचें नांव ऐकतांच तो भक्तशिरोमणी उल्हसित झाला व सैनिकांसमवेत जाण्यास तत्परतेनें उठला.

इकडे राजमंदिरांत आपला भक्त येणार म्हणून श्रीकृष्णांनीं सत्यभामेस सीतामाई बनून आपल्या बाजूस सिंहासनावर बसण्यासाठीं तयार होण्यास सांगितलें. सत्यभामा गोंधळली. सीता शालू कोणते नेसत असे, अलंकार कशी घालत असे, याचाच ती विचार करूं लागली.

मारुती राजप्रवेशद्वाराजवळ येऊन ठेपला. सत्यभामा तयार नाहीं. कृष्ण स्वतः राम झाला. व रुक्मिणीलाच त्यानें आपल्या बाजूला सीता म्हणून बसण्यास सांगितलें. आणि आपली आयुधें शंख, चक्र व गदा यांना अनुक्रमें लक्ष्मण, भरत शत्रुघ्न बनविलें. अशा रीतीनें रामपंचायतनांतल्या रामाचें दर्शन त्यानें आपल्या लाडक्या भक्तास दिलें. रामप्रभूस पाहतांच त्या थोर भक्ताचें हृदय भक्तीनें उचंबळून आलें. त्यानें साष्टांग लोटांगण घातलें. कांहीं दिवस द्वारकेंत राहून हनुमंत भगवंताचा निरोप घेऊन आनंदानें पुढील मार्गास लागला.

श्रीसाईनाथांना देखील आपल्या भक्तांच्या भक्तीची पराकाष्ठा पाहून त्यांना निरनिराळ्या स्वरूपांत वेळोवेळीं दर्शन दिलें आहे.

(संकलित)

# श्रीसाईसच्चरित – गद्यानुवाद

लेः : एक साईभक्त



## अध्याय चवथा
## ( समाप्त )

त्या मुलाचें तें सुंदर रूप आणि एवढ्या कोवळ्या वयांत शीतोष्णाची कांहींच पर्वा न करितां त्यानें आरंभलेली तपश्चर्या पाहून सर्व लोक विस्मयानें थक्क झाले. ल्हान वय आणि ही सत्वस्थ स्थिति पाहून ग्रामस्थ आश्चर्य करूं लागले. गांवोगांवची मंडळी त्या मुलाच्या दर्शनाला येऊं लागली. दिवसा कोणाच्या संगतींत नाहीं. रात्रीं कोणाची भीतीही नाहीं. ही बालमूर्ति कोठून आली याबद्दल सर्वांना कुतूहल वाटूं लागलें. त्या मुलाचें तें गोजिरवाणें रूप पाहून प्रत्येकाला त्याच्याबद्दल प्रेम वाटूं लागलें, परंतु हा कुणाच्या घरींदारीं जात नसे. व अहर्निश निंबाच्या झाडापाशीं पडलेला असे. इतकें ल्हान वय आणि हा पोर रात्रंदिवस उघड्यावर पडून तरी कसा राहतो, याबद्दल प्रत्येक जण आश्चर्य करीत असत. दिसावयास जरी पोर असला तरी त्याची करणी मोठ्या माणसाला लाजवील अशीच असे. प्रत्येक बाबतींत वैराग्याचा पूर्णावतारच होता तो आणि म्हणून सर्वांना त्याच्याबद्दल कुतूहल वाटत असे.

एके दिवशीं काय नवल झालें पहा. गांवकऱ्यांपैकीं दोघांचौघांच्या अंगांत खंडोबाचें वारें येऊन ते घुमूं लागले. झालें. लागलीच मंडळी त्यांना प्रश्न विचारूं लागली. "देवा खंडोबा, हें कोणा समान्याचें पोर आहे. हें कोठून आलें इथवर.' 'देवा, तू तरी शोध करून सांग. देव म्हणाला, 'जा, कुदळी घेऊन या. मी दावितों त्या जागीं कुदळी मारून खणा म्हणजे या पोराचा ठिकाणा लागेल.' गांवाच्या बाजूला असलेल्या निंबाखालीं तो पोर बसत असे. त्याच ठिकाणीं देवानें कुदळ हाणायला सांगितलें. कुदळींनीं खणून माती उकरतांच खालीं विटा लागल्या. विटांचा थर बाजूला करतांच आंत लोकांना एक भुयार दिसलें. तें चांगलें चुन्यानें बांधलेलें पक्कें तळघर असून आंत चार समया तेवत होत्या. जवळच आसन असून त्यावर एक गोमुखी व एक जपमाला होती. देव म्हणाला कीं, याच आसनावर बसून या पोरानें बारा वर्षें तपश्चर्या केली आहे. लोक आश्चर्यचकित झाले. खोदून खोदून त्या पोराला विचारूं लागले. पण तो पोर कसला मुलखाचा गमत्या. त्यानें भलतीच कथा सांगितली. तो म्हणाला, हें माझ्या गुरूचें स्थान असुन माझें पवित्र वतन

आहे. करितां माझें हें वचन सत्य मानून आहे त्या स्थितींतच या स्थानाचें जतन करा. बाबा असें बोलते झाले आणि लोकांनीं तें ऐकलें. बाबा कांहीं भलतें सलतें बोलले असावेत असें का मला वाटावें ? माझेंच मला आश्चर्य वाटतें कीं, बाबांविषयीं माझा असा समज कां व्हावा ? हं, आतां उमजलें. कदाचित् बाबांनीं ही गंमत केली असेल. मुळचेच बाबा विनोदप्रिय. हें भुयार त्यांचेच ठिकाण असेलही; परंतु तें त्यांच्या गुरूचें स्थान म्हटलें म्हणून त्याचें महत्त्व कमी होणार आहे का ? जसा अश्वत्थ किंवा औदुंबर तसाच बाबांना निंबवृक्ष पवित्र वाटे. त्यावर त्यांचें फार प्रेम आणि त्याबद्दल त्यांना अतिशय आदर असे. म्हाळसापति आदिकरून शिरगांवची जुनी ग्रामस्थ मंडळी बाबांच्या गुरूंचें हें समाधिस्थान म्हणून त्या ठिकाणाला नेहमीं वंदन करीत असत. त्या समाधीशेजारीं मौन धरून बाबांनीं बारा वर्षे तपश्चर्या केली म्हणून सगळीकडे ही वार्ता प्रसिद्ध झाली.

या समाधि आणि निंबवृक्षा सभोंवारची चौपूरे जागा बाबांचे भक्त साठेसाहेब यांनीं विकत घेऊन तेथें एक चारखणी इमारत उठविली. हाच वाडा आल्या गेल्या यात्रेकरूंना राहण्यासाठीं उपयोगांत येऊं लागला. साठ्यांनीं निंबाला पार बांधला व दक्षिणोत्तर माड्या काढून उत्तरेचा जिना तयार करतांना हें भूयार दाखविलें. जिन्याखालीं दक्षिणाभिमुख एक सुरेख कोनाडा आहे, त्याच्यासमोर पारावर भक्त बसतात.

गुरुवारीं आणि शुक्रवारीं सूर्यास्ताच्यावेळीं ही जागा सारवून ह्या ठिकाणीं जो क्षणभर ऊद जाळील त्याला श्रीहरि नेहमीं सुख देईल. हें खरें आहे किंवा ही अतिशयोक्ती आहे म्हणून कदाचित् श्रोत्यांच्या मनांत शंका येण्याचा संभव आहे; परंतु हें श्रीसाईमुखांतून निघालेलें वाक्य ऐकलेलें आहे. माझ्या पदरचें मी सांगत नाहीं. ज्यांनीं हें प्रत्यक्ष श्रवण केलें आहे ती मंडळी अद्यापि ह्यात आहेत.

नंतर दिक्षित वाडा बांधण्यांत आला. पुष्कळ बिऱ्हाडांची सोय झाली. पुढें अल्प काळांत दगडीवाडाही उठला. दिक्षित अगोदरच कीर्तिवंत, भावार्थाची जणूं काय ओतीव मूर्तीच ! विलायतच्या यात्रेस जाऊन तेथेंच भावार्थ बीज रोवून आले. येथें श्रोते कदाचित् शंका घेतील कीं, मथुरा, काशी, द्वारका सोडून आंग्ल प्रदेश यात्रा परमार्थदायक कशी झाली ? श्रोत्यांना ही शंका येणें साहजिक आहे. परंतु तिचें निरसन होतांच त्यांना कौतुक वाटेल. कारण यांत थोडेसें विषयांतर होत आहे म्हणून आपण सर्वांनीं मला क्षमा करावी. काशी, प्रयाग, बद्रिकेदार, मथुरा, वृंदावन आणि द्वारका इत्यादि तीर्थयात्रांचें पुण्य त्यांना अगोदरच मिळालें होतें. याशिवाय अपूर्व पुण्याई, सौभाग्य आणि पूर्वसंचित यामुळेंच त्यांना श्रीसाईदर्शन झालें. विलायतेंत असतांना पाय घसरून पडल्यामुळें पायांत जो पांगुळपणा आला तेंच या दर्शनाचें एक मुख्य कारण झालें. वरून दिसायला हा जरी कुयोग होता तरी तो परिपक्व गुरुपुण्ययोग होता. त्यामुळें सदुद्योग फळाला येऊन अलभ्य असा साईसहवास योग त्यांना लाभला. नानासाहेब चांदोरकरांची भेट झाली. साईंची माहिती मिळाली. चांदोरकरांनीं सांगितलें, साईदर्शन अनुभव घ्या; म्हणजे जाईल तुमचा

पांगुळपणा. दीक्षित लंगड्या पायाच्या उणेपणाला महत्त्व देत नव्हते. ते म्हणाले कीं, साईंनीं मनाचा लंगडेपणा घालवावा. हा नरदेह रुधीर आणि हाडामासांचा बनलेला असून, क्षणभंगुर आहे. पाय लंगडा राहिला म्हणून बिघडलें कुठें ?

एकोणीसशें नऊ सालच्या नोव्हेंबर महिन्याच्या दोन तारखेस दिक्षितांना प्रथम साईपुण्य दर्शन घडलें. पुढें त्याच वर्षी डिसेंबर महिन्यांत दर्शनासाठीं पुन्हां ते शिरडीस गेले. आणि तेथेंच रहावें असें त्यांच्या मनास वाटूं लागलें. यात्रेकरूंच्या सोईसाठीं पंचवीस शेअर्स काढून एक पत्र्याचें छप्पर बांधावें असा विचार त्यांच्या मनांत प्रथम आला. पुढें एक वाडा बांधावा म्हणून त्यांनीं निर्णय घेतला. व पुढील वर्षीच मुहूर्त मेढ करून पायाचा दगड बसविला. डिसेंबरची नऊ तारीख. त्यादिवशीं बाबांची संमती घेतली आणि ती सुमुहूर्तें मानून पाया घातला. बोलावूनही आले नसते ते दिक्षितांचे बंधूही त्याच मुहूर्तावर आधींच येऊन ठेपले होते. दादासाहेब खापर्डे पूर्वींच येऊन राहिले होते. परत जाण्यासाठीं बाबांची परवानगी मिळण्यास त्यांना किती यातायात पडली. दहा डिसेंबर रोजीं खापर्ड्यांना घरीं परतण्याची आज्ञा जाहली आणि दिक्षितांना पाया घालण्याची परवानगी मिळाली. या दिवसाचें आणखी महत्व म्हणजे चावडीमध्यें भक्तिप्रितीयुक्त अशी जी शेजारती होते ती याच दिवसापासून सुरू झाली.

पुढें सन एकुणीसशें अकरामध्यें रामनवमीच्या शुभ मुहूर्तावर गृहप्रवेशादि विधी उरकून घेण्यांत आले. नंतर अलोट पैसा खर्ची घालून बुटीचा मोठा वाडा उभारला गेला व या वाड्यांतच बाबांनीं चिर–विश्रांति घेतली. खर्चिलेल्या पैशांचें खरोखरच सार्थक झालें. जेथें पूर्वीं कांहीं नव्हतें तेथें आतां तीन वाडे झाले. आणि सुरवातीस बांधण्यांत आलेल्या साठ्यांच्या वाड्याची उपयुक्तता सगळ्यांना कळून चुकली. या वाड्याची महती म्हटली म्हणजे आरंभीं या जागेवर बाबांनीं स्वतःच्या हातानें लावलेली फुलबाग होती. या बागेची छोटी कथा पुढील अध्यायांत देईन असें सांगून श्रोत्यांसमवेत हेमाड श्रीसाईचरणीं माथा ठेवीत आहे. बागेसंबंधीं सांगावयाचें म्हणजे वामन तात्या पाण्यानें भरून आणलेले घडे पुरवित असे व साईसमर्थांनीं पाणी शिंपून त्या जागीं बाग फुलविली. पुढें बाबा गुप्त झाले. नंतर औरंगाबादेपाशीं चांद पाटलांची भेट होऊन त्यांच्या वऱ्हाडाबरोबर बाबा परत शिरडीस आले. पुढें देवीदासांची भेट होऊन जानकीदासाची गांठ पडली व गंगागिरांची दृष्टादृष्ट झाली. असें हें त्रिकूट शिरडीस जमलें. मोहिद्दीनबरोबर कुस्ती झाली आणि नंतर बाबा मशिदींत वस्तीस आले. त्यानंतर गुळाच्या ठेपीला जसे मुंगळे डसतात तसे भक्त बाबांच्या भोंवतीं जमूं लागले. या सर्व कथा आपण पुढील अध्यायीं श्रवण कराल. आतां हेमाड श्रीसाईस शरण येऊन त्यांना अनन्य लोटांगण घालीत आहे.

असा रीतीनें श्रीसंतजनांनीं प्रेरीत केलेला आणि हेमाडपंतांनीं रचलेल्या श्रीसाई समर्थ सच्चरित्राचा साईसमर्थावतरण नामें चौथा अध्याय संपूर्ण झाला.

॥ श्रीसद्गुरू साईनाथार्पणमस्तु ॥ शुभं भवतु ॥

# ज्योत भक्तिची हृदीं तेवुं दे

( राग : जयजयवंती.  ताल : त्रिताल.  चाल : सुखाच्या या लहरी आतां )

पहांटेची कांकड आरती । प्रशांत नीरव त्या एकांतीं  ॥ ध्रु० ॥

मोहमयीचे भक्त धांवती ।
नागपूरची गाडि गांठिती ।
डबीं दौंडच्या निद्रा राती ।
आरति वेळा जियें साधिती  ॥ १ ॥

कुलकर्णी ते सुहास्य वदनीं ।
विद्युत्केंद्रा चालू करुनी ।
ध्वनीमुद्रिका भक्ति लावुनी ।
भक्ता स्नाना आठव देती  ॥ २ ॥

एका बाजू बंधुभक्तगण ।
माता भगिनी सुप्रसन्न मन ।
मधुर निनादें सांइ दयाघन ।
देइ विचारा शुभवरा गती  ॥ ३ ॥

प्रसाद लोणी साखर घेउनी ।
शिला धुनी ती मूर्ति वंदुनी ।
स्थाना गुरुच्या नमना जाती  ॥ ४ ॥

ज्योत भक्तिची हृदीं तेवुं दे ।
सेवा कार्ये तुझीं होऊं दे ।
पतिपत्नी सुत नामीं रमुं दे ।
मातृपितृ पुण्ये ही विनती  ॥ ५ ॥

उत्सवांतल्या प्रमुख दिनाला ।
तुम्हां ठेविती जागें निशिला ।
विविधकलांनीं ऐकुनि स्तुतिला ।
स्फूर्ति आपुलि बालांना ती  ॥ ६ ॥

— बाबांच्या बाळाचें बाळ

# दोन वृत्तींचा झगडा

*****************************

## तुम्हांला कोणती वृत्ति आवडते ?

कोठेंही जा; आपणास दोन वृत्तींचीं माणसें आढळून येतील. त्या वृत्तींना आपण भ्रमर प्रवृत्ति व काक प्रवृत्ति असें म्हणूं या. या दोन प्रवृत्तींत जमीन अस्मानाचें अंतर आढळून येईल.

## मध तेवढा घ्यायचा

भ्रमर म्हणजे भुंगा. जेथें जेथें मध आढळून येईल, तेथून तो गोळा करून आणावयाचा, जें गोड मधुर असेल तें निवडून घ्यावयाचें, गोडें तेवढें घ्यावयाचें. नेहमीं चांगल्याकडे, गोडाकडे, सुगंधाकडे दृष्टि ही भ्रमर प्रवृत्ति. कुठें कुठें माणसांतही ही वृत्ती आढळून येते. गुण दिसतील तेवढेच निवडावयाचे; सद्‌गुणांकडे नेहमीं लक्ष. दुसऱ्याचे परमाणुतुल्य सद्‌गुण असतील तेवढेच वापराणावयाचे, त्यांचें कोडकौतुक करावयाचें व दुर्गुणांकडे दुर्लक्ष करावयाचें. त्यांचें मनन, चिंतन करायचेंच नाहीं. या सात्विक भावनेचा लाभ झालेलीं साधु वृत्तीचीं कांहीं माणसें आजकाल समाजांत वावरत आहेत म्हणून तर समाज चाललेला आहे; परंतु तीं फार थोडीं आहेत.

## लक्ष नेहमीं घाणीकडे

आतां याच्या उलट काक प्रवृत्ति, ती मोठी विलक्षण असते. सारी जगांतील घाण उपसायची! नेहमीं लक्ष घाणीकडे, दुर्गंधाकडे, दुष्ट प्रवृत्तींकडे! अशा वृत्तीच्या माणसांना दुसऱ्याचे दुर्गुण उगाळणें, त्यांचें रसभरीत वर्णन करणें मनापासून आवडतें. नेहमीं दुसऱ्यांच्या उणेपणावर, व्यंगावर व वाईटावर दृष्टि खिळलेली!

भ्रमरवृत्ति उगाच नाहीं अंगीं बाणत. ती अंगीं बाणायला पूर्व संचिताची, पूर्ण पुण्याईची जोड लागत असते. 'बहुत सुकृताची जोडी। म्हणून विठ्ठल आवडी॥' सद्‌गुणांची आवड व दुर्गुणांची नावड असा हा सामना आहे. माणसाची दृष्टि वाईटाकडे सहज खेंचली जाते. चांगलीकडे खेंचली जायला स्वतःच्या अंगीं तसाच चांगुलपणा असावा लागतो. दुर्गुणांकडे ओढा ही झाली माणसाची सहज प्रवृत्ति. त्यामुळें काक प्रवृत्तीचीं माणसें समाजांत बहुसंख्य आढळून येत असतात.

## मधुकर वृत्तीची जरूरी

आजकाल कुठेंहि पहा; गुणापेक्षां अवगुणांचें अवडंबर माजलेलें आढळून येईल. दुर्गुणांचें स्तोम न माजवितां, त्याचें चर्वितचर्वण न करतां ते दृष्टिआड करण्याची प्रवृत्ति बळावली पाहिजे. समाजांत मधुप किंवा भ्रमर वृत्ति सर्वत्र पसरविली गेली

पाहिजे. भ्रमर प्रवृत्ति म्हणजे बंधुभाव वृत्ति एकमेकांबद्दल सहानुभूति प्रगट करण्याची प्रवृत्ति हीच प्रवृत्ति. दिवसेंदिवस वाढत गेली पाहिजे. ही प्रवृत्ति म्हणजे समाजाचा सर्वाधार. समाजाची धारणा त्या गुणांवर अवलंबून आहे.

यासाठीं काकवृत्ति किंवा काकदृष्टि सोडून आपण भ्रमरवृत्तीचा—मध तेवढा निवडून घेण्याची, गुण तेवढे आत्मसात् करण्याची व गुणवान् बनण्याची प्रतिज्ञा करूं या.

---

# श्रीसाईनाथ वाचनालय, शिरडी

( ग्रंथपाल यांजकडून )

श्रीसाईनाथ कै. अण्णासाहेब दाभोळकर वाचनालयास देणगीदाखल मिळालेलीं पुस्तकें व नियतकालिकें:—

| भक्तांचीं नांवें | पत्ता | पुस्तकांचीं नांवें |
|---|---|---|
| १. श्री. माणीकचंद शिवचंद पारिख | शिर्डी | हंसू आणि आंसू |
| २. श्री. विजय बी. कुलकर्णी | अकनुज | अब्राहाम लिंकन ( इंग्लीश ) |
| ३. रामचंद्र जसाराम हरी रमाणी | शिर्डी | चित्रमय श्रीमद्‌भगवद्गीता ( हिंदी ) [ किंमत ६ रुपये ] |
| ४. श्री. छत्तुमले श्वरदास | मुंबई | राम – सुधा ( मराठी ) |
| ५. श्री. शिवाजी एम्. शेठ्ये | राहुरी | स्वराज्याची प्रभात ( मराठी ) |
| ६. श्री. विठ्ठल मांजरेकर | शिर्डी | बंगालचा शेर ( मराठी ) |
| ७. प्रतापराय मोहनलाल मोदी | बडोदा | भगवत्‌गीता ( गुजराथी ) |
| **साप्ताहिकें** | | |
| १. संपादक बी. पी. चरखा | पुलगांव | उजाला |
| २. ,, प्रभाकर शंकरराव परुळेकर | बेळगांव | बेळगांव समाचार |
| ३. संपादिका मालतीबाई तेंडुलकर | मुंबई | हर हर महादेव |
| ४. संपादक वि. ग. कुंटे | अ. नगर | सुदर्शन |
| ५. ,, द. र. निसळ | ,, | संदेश |
| ६. ,, चंदनमल म. गुंदेचा | ,, | नवा मराठा |
| ७. ,, रामचंद्र विठ्ठल निसळ | ,, | आझाद हिंद |
| ८. ,, भा. नि निसळ | ,, | संघशक्ति |
| **दैनिकें** | | |
| १. संपादक ग. गो. जाधव | कोल्हापूर | पुढारी |
| २. ,, द. श. पोतनीस | औरंगाबाद | अजिंठा |




# ( एप्रिल १९६० )

या महिन्यात भक्तमंडळी श्रीचे दर्शनास बरीच आली होती. खालील कार्यक्रम या महिन्यांत झालेः——

**कीर्तनः**—ह. भ. प. तुकारामबुवा आजेगांवकर, श्री. श्री. बा ऊर्फ बाबुराव देव वकील ठाणे सं. ट्र. श्री. द. दा. ऊर्फ नानासाहेब रासने पुणे सं. ट्र., श्रीमती कृष्णाबाई येवलेकर सातारा, ह. भ. प. निळकंठ सदाशिव कुळकर्णी खामगांव व श्री. मराठे. सं. गवई

**पुराणः**—हिंदीभाषेंतून श्री. ह. भ. प. बनारस गिरीजी, ( धुळिया ) यांचें झालें.

**श्रीसाईगीतप्रसादः**—श्री.यशवंतराव देव मुंबई व कुमारी सुप्रभात काळे मुंबई, तबलावादन अण्णा मोरे मुंबई क्वालिटी प्रॉडक्शन साईगीत प्रसाद )

**गायक** श्री. गणपतराव देवासकर मुंबई श्री. लहानू मास्तर नागपुरे अ. नगर, सौ. मेनका शिरोडकर मुंबई, कु. उषा गाडे मुंबई, कु. रसिका भंडारी खार मुंबई, सौ. प्रमिलाबाई लाड, श्री. उपराव औधकर नगर, श्री. शंकर जावलकर नगर, कु. सुलभा कांबळी अमरनाथ श्री. श्रीकृष्ण महादेव केतकर वकील इंदौर, श्री. हरी महादेव केतकर इंदौर.-वकील उज्जैन.

## शिवजयंती व महाराष्ट्र स्थापना दीन—

श्रीशिवजयंती व महाराष्ट्र राज्य स्थापन दिन उत्सव दिनांक २७।४।६० बुधवारीं पहाटे श्रींचे समाधी मंदिरावरील गच्चीवर श्रीशिवाजी महाराज फोटो पूजन व ध्वज वंदन, सर्व संस्थान नोकर सेक्रेटरी व प्रतिष्ठित गावांतील मंडळीसह शाळेंतील मुलामुली सर्व मास्तर मंडळीसह झेंडावंदन, दुपारीं नाना तऱ्हेचे खेळ, रात्रौ पक्वान्नांचें भोजन व दिव्यांची रोषणाई, मिरवणूक, गायन, कीर्तन वगैरे कार्यक्रम संस्थानचे व्यवस्थापक अधिकारी यांचे हस्तें झाले. त्याचप्रमाणें श्रीसाईनाथ नाट्य मंडळी यांचा ( रक्ताचें नातें ) या सामाजिक नाटकाचा प्रयोग झाला.

## थोरा मोठ्यांच्या भेटी—

डि. से. जजसाहेब नगर सहकुटुंब श्रीची पूजाअर्चा प्रसाद आरती वगैरे आटोपून गेले.

..........






तारेचा पत्ता : 'ABHAY' Hyderabad. टेलिफोन नं. ४६३८

# हैद्राबाद सॅनेटोरियम

**खास क्षयरोग्यांसाठीं !**

हवेशीर आधुनिक सुखसोयीनींयुक्त अत्यंत माफक दर असलेलें व साईभक्तांनीं चालविलेलें एकमेव ठिकाण.

पुण्याहून रेल्वेनें फक्त बारा तासांचा प्रवास.

## गरीब साईभक्तांसाठीं खास सवलत

विशेष माहितीकरितां खालील पत्त्यावर लिहा :—

**सुपरिंटेंडेंट हैद्राबाद सॅनेटोरियम,**
**रमतापूर, हैद्राबाद १३. [ आंध्र प्रदेश ]**








★

संगीताची मोहिनी माणसाला मंत्रमुग्ध करते. त्याचप्रमाणें कुठल्याहि हृदयंगम चित्राची मुद्रणकृति वाचकाला नयनमुग्ध करते!

★

आणि म्हणूनच

हाफ-टोन, लाईन, थ्री अँड फोर कलर ब्लॉक्स,

ऑफसेट प्लेटस्, स्टीरियोज इत्यादि

आणि त्याचप्रमाणें वैशिष्ट्यपूर्ण

सर्वांगसुंदर कॅलेंडर्ससाठीं—

# डी. डी. नेरॉय

५२४, सँडहर्स्ट ब्रिज, चौपाटी, मुंबई

टेलिफोन : ७५०४७

डी. डी. नेरॉय यांनी तयार केलेले श्री साईबाबांचें तीन रंगी चित्र, द्वारकामाई व इतर एक रंगी फोटो—साईज १० × ८, १० × १४, १४ × २० व पोस्टकार्ड साइज खालील ठिकाणीं मिळण्याची खास व्यवस्था केली आहे.

श्री. सगुण मेरु नाईक

मु. पो. शिर्डी, जि. अहमदनगर



मुद्रक: शा. कृ. सापळे, रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस, मोरबाग रोड, दादर, मुंबई १४.

संपादक व प्रकाशक : ना. का. सावंत, ईस्ट ॲन्ड वेस्ट इन्शुअरन्स बिल्डिंग, ४९/५५, आपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई १.